

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

गुरुवार, दि. १९ मार्च २०२६

शांत निवांत शिशिर सरला, सळसळता
हिरवा वसंत आला, कोकिळेच्या
सुरुवातीसोबत, चैत्र 'पाडवा' दारी आला...
गुढीपाडवा अन् नूतन वर्षाभिनंदन !



संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १११ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# नाशिकचा 'हायप्रोफाईल' भोंदू बाबा जेरबंद


## अशा लिंगपिसाटाला मदत केल्यास जबाबदारी कोण घेणार? अंधारेंचा निशाणा; चाकणकरांनी पाद्यपूजा केल्याचा व्हिडिओ समोर

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

नाशिकमधील स्वयंघोषित ज्योतिषी अशोक खरात उर्फ 'कॅप्टन' याला बलात्कार आणि भोंदूगिरी प्रकरणी अटक झाल्यानंतर आता या प्रकरणावर राजकीय प्रतिक्रिया उमटत आहेत. "महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या 'छत्रछाये'खालीच अशा भामट्यांचे उद्योग सुरू आहेत," असा घणाघाती आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे. यासोबतच त्यांनी रूपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची अप्रत्यक्ष मागणी देखील केली आहे.



एका ३५ वर्षीय महिलेला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर अत्याचार केल्याच्या आरोपाखाली नाशिक गुन्हे शाखेच्या युनिट १ ने अशोक खरातला अटक केली. खरातच्या ताब्यातून पोलिसांनी एक पेनड्राइव्ह जप्त केला असून, त्यात ५८ आक्षेपार्ह व्हिडीओ आढळल्याने खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे अनेक राजकीय नेते, अधिकारी, सेलिब्रिटी आपले भविष्य जाणून घेण्यासाठी अशोक खरात याच्याकडे जात होते. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर या अशोक खरात याच्या संस्थेवर पदाधिकारी म्हणून आहेत. यावरून सुषमा अंधारे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत रूपाली चाकणकर यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. सुषमा अंधारे आपल्या पोस्टमध्ये म्हणाल्या, कॅप्टन अशोक खरात नावाच्या स्वयंघोषित ज्योतिषाला आज नाशिक पोलिसांनी अटक केली खरात याच्यावर बलात्कार योन शोषण यासारखे आरोप आहेत. पोलिसांनी हस्तगत केलेल्या पेन ड्राईव्ह मधून 58 आक्षेपार्ह व्हिडिओ पोलिसांनी हस्तगत केल्याची माहिती समोर येत आहे. हे उल्लेखनीय आहे की या स्वयंघोषित ज्योतिषाकडे अनेक राजकीय नेत्यांचा राबता होता. केसरकर तटकरे चाकणकर अशी काही राजकीय भक्तांची नावे... अनेक राजकीय नेत्यांनी या ज्योतिषाच्या सांगण्यावर वेगवेगळ्या पूजा करणे, स्वतःच्या हाताची करंगळी कापून घेणे असे अघोरी उद्योग सुद्धा केल्याचे लोक चर्चा करत आहेत. सुषमा अंधारे म्हणाल्या, विशेष यापूर्वी सुद्धा अशोक खरात याच्यावर जेव्हा लैंगिक शोषणाचे आरोप एका संस्थेने केले तेव्हा चाकणकर यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करत संबंधित संस्थेकडून दबाव आणून माफीनामा घेतला होता. विशेष; खरात यांनी स्थापन केलेल्या संस्थेवर रूपाली चाकणकर संचालक म्हणून काम करतात. खरात याच्या घरच्या लग्न कार्यामध्ये चाकणकर जातीने आवभगत करताना बघून अनेकांना आश्चर्य वाटले होते. आता आम्हाला शंका नव्हे भीती आहे, पुन्हा एकदा महिला आयोगासारख्या अत्यंत जबाबदार पदाचा दुरुपयोग करत रूपाली चाकणकर यांनी अशा लिंगपिसाट माणसाला मदत केली तर याची जबाबदारी कोण घेणार? कारण अशा भामट्या ज्योतिष्यासाठी स्वतः छत्री घेऊन चाकणकर उभ्या आहेत, असेही सुषमा अंधारे यांनी म्हटले आहे.



# जुन्या वाहनधारकांना झटका; पर्यावरण कर दुप्पट, विधेयकाला मंजुरी

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील जुन्या आणि प्रदूषणकारी वाहनधारकांसाठी मोठा आर्थिक झटका ठरणारा निर्णय आज विधिमंडळात घेण्यात आला. महाराष्ट्र मोटर वाहन कर (सुधारणा) विधेयक, 2026 एकमताने मंजूर करण्यात आले असून, पर्यावरण करात दुप्पट वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधेयक मांडताना सांगितले की, वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे, पर्यावरण संरक्षणाला चालना देणे आणि परिवहन व्यवस्थेत सुधारणा करणे या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. नवीन कररचनेनुसार, दुचाकी वाहनांसाठी पर्यावरण कर 2000 रुपयांवरून 4000 रुपये, पेट्रोल वाहनांसाठी 3000 रुपयांवरून 6000 रुपये, डिझेल वाहनांसाठी 3500 रुपयांवरून 7000 रुपये करण्यात आला आहे. हा कर दर पाच वर्षांसाठी एकरकमी भरावा लागणार आहे. या निर्णयामुळे राज्य सरकारला दरवर्षी सुमारे 160 कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल मिळण्याची अपेक्षा आहे. हा निधी रस्ता सुरक्षा, आधुनिक परिवहन सुविधा, एटीएस प्रणाली बळकट करणे आणि प्रशिक्षण यासाठी वापरण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. दरम्यान, औद्योगिक क्षेत्राला दिलासा देत क्रेन वाहनांवरील मोटार करासाठी 30 लाख रुपयांची कमाल मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. यामुळे बांधकाम आणि पायाभूत सुविधा क्षेत्राला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या विधेयकामुळे बीएस-6 आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन मिळणार असून, पर्यावरणपूरक वाहतूक प्रणालीकडे राज्याची वाटचाल अधिक वेगाने होईल, असा विश्वास सरकारकडून व्यक्त करण्यात आला आहे.










## थोडक्यात...

### तलवारीने घाव घालून मारेकऱ्याची हत्या

**गोंदिया (समर्थ गांवकरी) :** वडिलांच्या खुनातील आरोपीचा तलवारीने घाव घालून मुलाने खून केल्याची घटना गोरेगाव तालुक्यातील ग्राम पालेवाडा-हेटी येथे सोमवारी (दि. 16) रात्री 8 वाजता घडली. देवेंद्र उर्फ भुरु चुन्नीलाल ताराम (वय 25, रा. पालेवाडा-हेटी) असे मृताचे नाव आहे. आरोपी सुनील आसाराम कांबळे (वय 27) याच्या वडिलांचा सन 2025 मध्ये खून झाला असून, देवेंद्र ताराम याच्यावर आरोपीच्या वडिलांच्या हत्येचा गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणात त्याला अटक करून कारागृहात पाठविण्यात आले होते. मात्र, तो आठ दिवसांपूर्वीच जामिनावर सुटून गावात आला होता. याचाच बदला घेण्यासाठी सुनील कांबळे संधीच्या शोधात होता. सोमवारी रात्री संधी साधून आरोपीने देवेंद्रवर तलवारीने गळा, मान, हात, पाय व पोटावर वार केल्याने त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

### राजस्थानमध्ये अपघात

**पिंपरी (समर्थ गांवकरी) :** तीन कार घेऊन पिंपरी-चिंचवड शहरातील काही तरुण लेह-लडाख आणि जम्मू-काश्मीरला फिरायला गेले होते. तेथून परत येत असताना बुधवारी (दि. 18 मार्च) राजस्थान येथील कोटा शहराजवळ त्यांच्या एका कारलाअपघात झाला. यात तिघांचा मृत्यू झाला. पिंपरी-चिंचवड शहरातील काही तरुण फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात फिरायला गेले होते. यातील तिघे जण तब्बेत खराब झाल्याने गेल्या आठवड्यात घरी परतले.




# मातृशक्तीच्या हस्ते ६८व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा भव्य शुभारंभ

## कुस्तीची परंपरा जपत महाराष्ट्राचा झेंडा जगात फडकवा – सुनेत्रा पवार यांचे आवाहन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



रामकृष्ण सातव पाटील यांच्या आयोजनातून वाघोली येथे ६८व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा भव्य शुभारंभ आज मातृशक्तीच्या हस्ते करण्यात आला. उपमुख्यमंत्री मा. श्रीमती सुनेत्रा वहिनी अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन पार पडले. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र राज्याच्या नगरविकास व परिवहन राज्यमंत्री मा. श्रीमती माधुरी सतिश मिसाळ, पुण्याच्या महापौर मा. सौ. मंजुषा दीपक नागपुरे यांच्यासह विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. उद्घाटन प्रसंगी बोलताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या, "कुस्तीची मोठी परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. या कुस्तीतूनच पाहिले ऑलिम्पिक आपल्या देशाला मिळाले. या महाराष्ट्रात अनेक दिग्गज मल्ल या कुस्तीतून घडले आहेत. कुस्तीची प्रतिष्ठा आपण जपली पाहिजे. महाराष्ट्राच्या मातीमध्ये घडलेले खेळाडू जागतिक पातळीवर झळकावेत हीच आदरणीय दादांची कायम भूमिका राहिलेली आहे. त्यांच्या या प्रयत्नामुळेच महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्राला नवी दिशा प्राप्त झाली . आदरणीय दादांच्या क्रीडा प्रेमाचा आणि तळमळीचा वारसा आपण सगळ्यांनीच पुढे नेऊयात. वाघोलीच्या स्पर्धेचे आयोजन खरंतर अत्यंत दिमागदार पद्धतीने करण्यात आलं त्यासाठी या स्पर्धेचे आयोजक रामकृष्ण सातव पाटील आणि त्यांच्या सर्वच सहकाऱ्यांचा मी विशेष अभिनंदन करते, त्यांचं कौतुक करते. या स्पर्धेमध्ये विजयी होणाऱ्या यंदाच्या महाराष्ट्र केसरींना आपल्या सर्वांचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांच्या हस्ते रविवारी दिनांक 22 मार्च रोजी बक्षीस वितरण होणार आहे. महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे उद्घाटन करताना खर तर मी एवढेच आवाहन करते की खेळाडूंनी आखाड्यामध्ये प्रामाणिकपणा दाखवा. आपला खेळ अतिशय चांगल्या प्रकारे सादर करा, आपल्या महाराष्ट्रचे नाव जगामध्ये उज्वल करा. या स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व महिलांचं मी मनापासून अभिनंदन करते. स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सर्व मल्लांना त्यांच्या प्रशिक्षकांना मनापासून शुभेच्छा देते".

## सुनेत्रा पवार यांच्या हस्ते उद्घाटन; महिलांच्या उपस्थितीत रंगला सोहळा, विजेत्यांना आकर्षक बक्षिसांची घोषणा

मंजुषा नागपुरे म्हणाल्या , " हा सोहळा महिलांच्या कर्तृत्वाचा उत्सवाचा आहे. महाराष्ट्र केसरीची परंपरा आजही आपण जपतो हीच खरी आदरांजली आहे. खेळाडूंना आपण योग्य to सन्मान म्हणून जिम कीट, त्याची संपूर्ण व्यवस्था आपण उत्तम पद्धतीने केली आहे. कुस्ती जोपासणे ही वाघोलीची परंपरा आहे. जागतिक स्तरावर कुस्तीला ग्लामर मिळणे आज गरजेचे आहे. महाराष्ट्र केसरी ठरलेले स्पर्धक पुन्हा यंदाच्या स्पर्धेत भाग घेत असल्याने यंदाची महाराष्ट्र कुस्ती स्पर्धा रंजक ठरणार आहे". रामकृष्ण सातव पाटील म्हणाले," नेहमी कुस्ती स्पर्धेला महिला भगिनींची संख्या कमी असते मात्र या वर्षी महिलांची संख्या खूप वाढली आहे. कुस्ती कडे पाहण्याचा दृष्टिकोन बदला पाहिजे ही संकल्पना होती त्यातूनच आज 4000 हजार महिलांचा सहभाग आज इथे झाला आहे . प्रथमताच कुस्ती स्पर्धेत महिलांचा गौरव होतं आहे.यंदाची स्पर्धा गावातील दानशूर व्यक्तीमुळे ही एवढी भव्य दिव्य होतं आहे". या स्पर्धेची सुरुवात स्व. कुस्ती महर्षी मामासाहेब मोहोळ यांनी केली होती. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेत रामकृष्ण सातव पाटील यांच्या नेतृत्वाखाली यंदाची ६८वी स्पर्धा भव्य आणि दिव्य स्वरूपात आयोजित करण्यात आली आहे. या क्रीडानगरीला "स्व. अजितदादा पवार क्रीडानगरी" असे नाव देऊन त्यांना अभिवादन करण्यात आले.

यंदाच्या स्पर्धेत विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली असून महाराष्ट्र केसरी विजेत्याला फॉर्च्युनर गाडी, उपविजेत्याला स्कॉर्पिओ N, तसेच विविध गटांतील सुवर्णपदक विजेत्यांना १८ बुलेट आणि रौप्य पदक विजेत्यांना स्प्लेंडर गाड्या देण्यात येणार आहेत. या बक्षिसांसाठी वाघोली ग्रामस्थ व हवेली तालुक्यातील दानशूर व्यक्तींनी योगदान दिले आहे.

स्पर्धेदरम्यान तरुणांसाठी फोटोग्राफी, रॅप यांसारख्या विविध स्पर्धांचे आयोजनही करण्यात आले आहे. यावेळी प्रमुख उपस्थितीत मा. सौ. मोनिका मुरलीधर मोहोळ, शिरूर हवेली आमदार माऊली कटके, मा. सौ. संजीला बापुसाहेब पठारे, मा. श्रीमती मालतीताई बाबुराव पाचर्णे, मा. सौ. सुजाता अशोक पवार, मा. सौ. मनीषा ज्ञानेश्वर कटके, मा. सौ. पूजा प्रदीप कंद उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून सन्माननीय पुणे मनपा नगरसेविका मा. सौ. श्रेयस प्रितम खांदवे, मा. सौ. ऐश्वर्या सुरेंद्र पठारे, मा. सौ. रत्नमाला संदीप सातव, मा. सौ. तृप्ती संतोष भरणे यांनी आयोजनाची धुरा सांभाळली. तसेच सन्माननीय जिल्हा परिषद सदस्या मा. सौ. सुरेखा रमेश हरगुडे, मा. सौ. कोमल संदेश आव्हाळे, मा. सौ. शितल सुजित कांबळे, मा. सौ. रुपाली रमेश कोंडे यांची उपस्थिती होती.

## रामनवमीच्या पावन पर्वावर शिर्डीत 'नानक साई अवॉर्ड'चा भव्य सोहळा – समाजातील मान्यवरांचा होणार गौरव

**छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)**

साई भक्तांच्या श्रद्धेचे केंद्र असलेल्या शिर्डीत यंदाची रामनवमी अधिक विशेष ठरणार असून, नानक साई फाऊंडेशनतर्फे सातवा 'नानक साई अवॉर्ड' सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांच्या गौरवासाठी आयोजित करण्यात आलेला हा सोहळा साई भक्तांसाठी एक प्रेरणादायी पर्व ठरणार आहे.

नानक साई फाऊंडेशनचे प्रमुख श्री. पंढरीनाथ बोकारे यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, २५ मार्च रोजी शिर्डीत 'विशाल साई भक्त संमेलन' आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनात 'नानक साई अवॉर्ड'चे वितरण होणार असून, राज्यभरातून साई भक्त, सामाजिक कार्यकर्ते,




पत्रकार आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

या अवॉर्ड सोहळ्याद्वारे कला, संस्कृती, सामाजिक कार्य, अध्यात्मिक सेवा तसेच पत्रकारिता या क्षेत्रात निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सन्मान करण्यात येणार आहे. समाजासाठी योगदान देणाऱ्या अशा व्यक्तींना एक व्यासपीठ देऊन त्यांच्या कार्याची दखल घेणे आणि इतरांना प्रेरणा देणे हा फाऊंडेशनचा मुख्य उद्देश आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी, श्री संत कवी दासगणू महाराज साई भक्त मंडळ, उमरी (गोरठे), साई मानव सेवा ट्रस्ट आणि साई धाम ट्रस्ट, रांची यांचे सहकार्य लाभत आहे. सर्वांच्या संयुक्त प्रयत्नातून हा सोहळा अधिक भव्य आणि संस्मरणीय करण्यासाठी जय्यत तयारी सुरू आहे. रामनवमीच्या शुभमुहूर्तावर आयोजित करण्यात येणारे हे संमेलन साई भक्तांसाठी केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, समाजसेवा आणि प्रेरणेचा संदेश देणारे एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. समाजात सकारात्मक कार्य करणाऱ्यांचा सन्मान करून त्यांच्या कार्याची प्रेरणा जनतेपर्यंत पोहोचवण्याचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे..

## वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रात पुढील पाच दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. अनेक जिल्ह्यात यलो अलर्ट जाहीर आहेत. काही ठिकाणी विजांच्या कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. दरम्यान, १८, १९ मार्च रोजी अहिल्यानगर जिल्ह्याला यलो अलर्ट देण्यात आला आहे. त्यामुळे शेतकरी शेतातील काढणीस आलेला गहू, हरभरा आणि ज्वारीची पिके वाचविण्याच्या कामाला लागला आहे. राज्यात उन्हाच्या कहिलीपासून नागरिकांना थोडाचा दिलासा मिळाला आहे. मात्र, शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. येत्या पाच दिवसांत राज्यात पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. यात विषेशतः मराठवाड्यातील काही जिल्हे आणि विदर्भातील काही जिल्ह्यात पावसाचा अंदाज आहे.

## सार्थक देशमुख नवोदय परीक्षेत जिल्हा यादीत झळकला

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

श्री अगस्ती एज्युकेशन सोसायटी संचलित महात्मा फुले विद्यालय सुगांव बु विद्यालयाचा इयत्ता पाचवीचा विद्यार्थी सार्थक संतोष देशमुख याने केंद्रीय जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत 97.50 गुण मिळवून नवोदय विद्यालय टाकळी ढोकेश्वर येथे प्रवेश मिळवत जिल्ह्यात 26वा क्रमांक पटकावून मानाचे स्थान मिळवले.दरवर्षी केंद्रीय जवाहर नवोदय विद्यालय अत्यंत यशस्वीपणे ही प्रवेश परीक्षा आयोजित करून गुणवंत व प्रज्ञावंत विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना संधी देत असते. या परीक्षेत ग्रामीण व शहरी अशी विभागणी असून ग्रामीण विभागात सार्थक ने कमालीचे यश मिळविले आहे.महात्मा फुले विद्यालयाने शिष्यवृत्ती परीक्षेबरोबरच नवोदय विद्यालयाच्या या परीक्षेसाठी नियमित सराव, जादा तास, विशेष



मार्गदर्शन आदी उपक्रमाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले आहेत.सार्थक याने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या अभ्यासात सातत्य ठेवले असल्यानेच त्याने हे यश मिळविले असल्याचे गौरोदगार गावचे शिक्षणप्रेमी प्रकाश अण्णासाहेब देशमुख यांनी काढले. विद्यालयाची यशाची परंपरा कायम ठेवण्यात यश मिळाले आहे. त्याच्या या यशाबद्दल संस्थेच्या सेक्रेटरी शैलजा पोखरकर, कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी, विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रकाश सोनवणे,शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी, सर्व ग्रामस्थ यांचेकडून सार्थक, व त्याला मार्गदर्शन करणारे सर्व शिक्षक यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिकच्या सर्जिकल विभागात 4K, 3D आणि ICG तंत्रज्ञानासह अत्याधुनिक लॅप्रोस्कोपिक सर्जरी प्रणालीची भर

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**



अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिकच्या सर्जिकल विभागात रुग्णांना अधिक सुरक्षित, अचूक आणि जागतिक दर्जाच्या शस्त्रक्रिया सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अत्याधुनिक 4K, 3D आणि ICG (Indocyanine Green) तंत्रज्ञानावर आधारित लॅप्रोस्कोपिक सर्जरी प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रगत तंत्रज्ञानामुळे शस्त्रक्रियेदरम्यान शरीरातील सूक्ष्म रचना अधिक स्पष्ट, त्रिमितीय (3D) स्वरूपात आणि अचूकपणे पाहता येतात, ज्यामुळे शस्त्रक्रियेची गुणवत्ता आणि सुरक्षितता लक्षणीयरीत्या वाढते. सर्जिकल विभागाचे प्रमुख आणि वरिष्ठ गॅस्ट्रोइंटेस्टाइनल सर्जन डॉ. संदीप सबनीस यांच्या नेतृत्वाखाली ही प्रणाली कार्यरत राहणार असून, त्यांच्या सर्जिकल टीममध्ये डॉ. प्रखर गुप्ता आणि डॉ. उर्विक पटेल यांचा समावेश आहे. अनुभवी टीम आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान यांच्या समन्वयामुळे रुग्णांना अधिक परिणामकारक आणि विश्वासार्ह उपचार मिळणार आहेत. या प्रणालीतील 4K तंत्रज्ञानामुळे पारंपरिक HD प्रणालीपेक्षा चारपट अधिक स्पष्ट चित्र मिळते, तर 3D व्हिजनमुळे सर्जन्सना खोलीचा (depth perception) अचूक अंदाज घेता येतो, ज्यामुळे शस्त्रक्रिया अधिक नेमकेपणाने करता येते. तसेच ICG तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शस्त्रक्रियेदरम्यान ऊतींचा रक्तपुरवठा (blood flow) प्रत्यक्ष पाहता येतो, ज्यामुळे महत्त्वाच्या संरचना ओळखणे सुलभ होते आणि गुंतागुंत टाळण्यास मदत होते. या तंत्रज्ञानाच्या मदतीने पित्ताशय, अपेंडिक्स, हर्निया, आतड्यांच्या शस्त्रक्रिया तसेच इतर जटिल लॅप्रोस्कोपिक प्रक्रियांमध्ये अधिक अचूकता साधता येणार आहे. मिनिमली इन्वेसिव्ह सर्जरीमुळे रुग्णांना कमी वेदना, कमी रक्तस्राव, लहान जखम आणि जलद पुनर्वसनाचा फायदा होतो. याबाबत बोलताना सर्जिकल विभाग प्रमुख डॉ. संदीप सबनीस म्हणाले, "4K, 3D आणि ICG या तिन्ही तंत्रज्ञानाचा एकत्रित वापर केल्यामुळे शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित, अचूक आणि वैज्ञानिक पद्धतीने करता येते. विशेषतः जटिल गॅस्ट्रोइंटेस्टाइनल सर्जरीमध्ये ICG तंत्रज्ञानामुळे ऊतींचा रक्तपुरवठा समजण्यास मदत होते, ज्यामुळे उपचारांचे परिणाम अधिक चांगले मिळतात. या अत्याधुनिक सुविधेमुळे नाशिकमध्येच जागतिक दर्जाच्या सर्जरी सेवा देणे शक्य झाले आहे." यावेळी हॉस्पिटलचे केंद्र प्रमुख श्री. अनुप त्रिपाठी यांनी सांगितले की, "सर्जिकल विभागाची क्षमता वाढवण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश करणे ही आमची प्राथमिकता आहे. 4K, 3D आणि ICG तंत्रज्ञानामुळे रुग्णांना अधिक सुरक्षित आणि परिणामकारक उपचार मिळतील. अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये आम्ही सातत्याने आधुनिक सुविधा उपलब्ध करून रुग्णांचा विश्वास अधिक दृढ करत आहोत."

## गुडी पाडव्याच्या शुभ प्रसंगी साड्यांचा संग्रह

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

साडीप्रेमींसाठी गुडी पाडवा हा केवळ एक सण नसून परंपरा, रंग आणि शाश्वत कलेचा उत्सव साजरा करण्याची खास संधी आहे. मार्च महिन्यात साजरा होणारा हा सण मराठी नववर्षाची सुरुवात दर्शवतो आणि नव्या आरंभ, समृद्धी व आनंदाचा संदेश देतो. या निमित्ताने कुटुंब आणि मित्रमंडळी एकत्र येऊन उत्सव साजरा करत असताना पारंपरिक पोशाख परिधान करणे हा या सणाचा अविभाज्य भाग ठरतो. या गुडी पाडव्याच्या निमित्ताने Nykaa Fashion साड्यांचा खास निवडक संग्रह सादर करत आहे, ज्यामुळे तुम्ही तुमच्या शैलीनुसार आणि व्यक्तिमत्त्वाला साजेशा रूपात अधिक आकर्षक दिसू शकता. पैठणी आणि कांजीवरमसारख्या पारंपरिक विणकामापासून ते झरीच्या समृद्ध कामाने सजलेल्या रेशमी साड्यांपर्यंत–उत्सवी साड्या आजही नव्या सुरुवातीचे स्वागत करण्यासाठी सर्वाधिक पसंतीचा पर्याय आहेत.

## पर्यावरण रक्षणासाठी पक्षी संवर्धन आवश्यक

### पक्षीमित्र प्रशांत मुथा

**श्रीगोंदाः (समर्थ गांवकरी)**



झाडे, वेली, जमीन, प्राणी, पक्षी आणि हवामान या सर्व घटकांच्या एकत्रित अस्तित्वातून निसर्गाची निर्मिती होते. हेच आपल्या सभोवतालचे पर्यावरण असून त्याचे संतुलन राखण्यासाठी सर्व घटक सुस्थितीत असणे आवश्यक आहे. सध्याच्या प्रदूषित वातावरणामुळे पक्ष्यांची संख्या घटत चालली असून, पक्ष्यांसाठी उपयुक्त झाडांचे संवर्धन केल्यास त्यांचे अस्तित्व टिकून राहील आणि पर्यावरणही संतुलित राहील, असे प्रतिपादन पक्षीमित्र तथा 'एक मित्र एक वृक्ष' संकल्पनेचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत मुथा यांनी केले. मढेवडगाव येथील उंडेमळा जिल्हा परिषद शाळेत अग्निपंख फाउंडेशनच्या देणगीतून 'पक्षी जपूया, निसर्ग वाचवूया' या उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकारमहर्षी नागवडे कारखान्याचे संचालक सुभाष शिंदे होते. प्रास्ताविक संतोष इंगावले यांनी केले. यावेळी गटविकास अधिकारी राणीताई फराटे तसेच शालेय पोषण आहार अधीक्षक सत्यजित मच्छिंद्र यांनीही पर्यावरण संवर्धनासाठी झाडांचे जतन आणि संवर्धन आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमास भाजपा अध्यक्षा देवयानी शिंदे, अग्निपंख फाउंडेशनचे कार्याध्यक्ष प्रा. संजय लाकूडझोडे, सरपंच प्रमोद शिंदे, जिल्हा शिक्षक बँकेचे माजी चेअरमन डॉ. संदीप मोटे, उपसरपंच सुनिता उंडे, ग्रामपंचायत सदस्य योगेश शिंदे, मधूकर शिंदे, बापूसाहेब ढवळे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोज सुपेकर, माजी अध्यक्ष नवनाथ उंडे, हितेश मुथा, संदीप मुथा, संजय सोनवणे, प्रदीप शेलार, साहेबराव उंडे, प्रमोद वाबळे, स्वयंरोजगार संस्थेचे अध्यक्ष प्रकाश मुळे, भरत शिंदे, उमाकांत राऊत तसेच प्रतिक्षा सुपेकर, निता मांडे, प्राजक्ता उंडे, तृप्ती शिंदे, प्रियांका शिंदे, रोहिणी वाबळे आदी माता-पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन मुख्याध्यापक रामदास ठाकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन नवनाथ उंडे यांनी मानले.

## डिस्नी ॲडव्हेंचरचे सिंगापूरमध्ये स्वागत

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

सिंगापूरला नवीन होमपोर्ट म्हणून निवडत डिस्नी क्रूझ लाइनच्या 'डिस्नी ॲडव्हेंचर' या बहुप्रतीक्षित जहाजाचे शानदार स्वागत करण्यात आले आहे. १० मार्च २०२६ रोजी या जहाजाने सिंगापूरहून आपल्या पहिल्या समुद्र प्रवासाला सुरुवात केली. कुटुंबांसह सर्व वयोगटातील प्रवाशांसाठी ३ आणि ४ रात्रींच्या आकर्षक समुद्री सहलींचे आयोजन या जहाजावर करण्यात येणार आहे.

डिस्नी, पिक्सार आणि मार्व्हल यांच्या १०० वर्षांहून अधिक समृद्ध वारशावर आधारित या जहाजावर प्रवाशांना जागतिक दर्जाचे मनोरंजन, विविध देशांच्या चविष्ट खाद्यपदार्थांचा आस्वाद आणि आकर्षक निवास सुविधा अनुभवता येणार आहेत. समुद्रातील आनंददायी सुट्ट्यांची परंपरा कायम ठेवत 'डिस्नी ॲडव्हेंचर' प्रवाशांना जादुई अनुभव देण्यास सज्ज आहे.

**या जहाजावर आंतरराष्ट्रीय खाद्यपदार्थांसोबत आशियातील लोकप्रिय पदार्थ, तसेच बबल टीसारखी नाविन्यपूर्ण पेये उपलब्ध असणार आहेत. याशिवाय सुमारे १७,००० चौरस फूट क्षेत्रात पसरलेल्या विशाल खरेदी विभागात प्रवाशांना विविध आकर्षक वस्तूंची खरेदी करण्याची संधीही मिळणार आहे.**

डिस्नी क्रूझ लाइनने २०३१ पर्यंत १३ जहाजांचा ताफा उभारण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, 'डिस्नी ट्रेझर' आणि 'डिस्नी डेस्टिनी'नंतर 'डिस्नी ॲडव्हेंचर' हे त्यातील आणखी एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

# पेन्शनसाठी ज्येष्ठ नागरिकांनी गिरविले अर्थ साक्षरतेचे धडे

## गुंतवणूकदारांनी मनात युद्ध सुरू ठेवू नये : सुनील कडलग

**नाशिकरोड : (समर्थ गांवकरी)**

इतिहास सांगतो की ज्या-ज्या वेळी शेअर बाजार कोसळतो, त्यानंतर तो पुन्हा सावरतो आणि वाढतो. सध्या इस्रायल-अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे गुंतवणूकदारांच्या मनातही चिंतेचे युद्ध सुरू आहे. मात्र, अशा काळात विचलित न होता संयमाने गुंतवणूक सुरू ठेवणे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. जर तुमची गुंतवणूक मुलांचे शिक्षण किंवा निवृत्तीनंतरचे नियोजन अशा दीर्घकालीन ध्येयासाठी असेल, तर युद्धाच्या बातम्यांकडे दुर्लक्ष करा आणि आपल्या मनातील भीतीचे युद्ध थांबवा, असे प्रतिपादन तज्ज्ञ सुनील कडलग यांनी केले. नाशिक रोड येथील जय भवानी ज्येष्ठ नागरिक सेवा संस्थेतर्फे हॉटेल हरियालीच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये 'म्युच्युअल फंडाद्वारे पेन्शनचे नियोजन व सायबर सिक्युरिटी' या विषयावर आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून समीर नाईक, डीएसपी म्युच्युअल फंडाचे पियूष कासट, आदित्य कडलग, पुरुषोत्तम रकीबे, सुधाकर जाचक आदि मान्यवर उपस्थित होते. नुकतेच सेवानिवृत्त झालेले पोलिस निरीक्षक तुकाराम चव्हाणके यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

सुनील कडलग यांनी उपस्थितांना आवाहन केले की, आपली एसआयपी कधीही थांबवू नका. बाजार खाली असताना त्याच पैशात जास्त युनिट्स मिळतात, त्यामुळे ही गुंतवणुकीची एक प्रकारची 'सेल' आहे असे समजावे.

भूतकाळात जेव्हा जेंव्हा युद्धजन्य किंवा आपत्कालीन परिस्थितीत बाजार कोसळला असताना ज्यांनी ज्यांनी म्युच्युअल फंडात गुंतवणूक केली त्यांना पुढच्या काही वर्षांमध्ये सरासरीपेक्षा जास्त परतावा मिळाला आहे, असे इतिहास सांगतो असेही ते म्हणाले.



समीर नाईक म्हणाले, युद्धाचे सावट दाटले की बाजार डगमगतात, पण भीतीचे खरे कारण युद्ध नसून त्यातून निर्माण झालेली अनिश्चितता असते. राजकीय समीकरणे कशी बदलतील याची स्पष्टता नसल्याने गुंतवणूकदार घाईने आपली गुंतवणूक विकतात. मात्र कोरोना किंवा मागील युद्धांच्या काळातही बाजार कोसळल्यानंतर अधिक वेगाने वर आला आहे, हे विसरता कामा नये. संघर्षाच्या काळात गुंतवणूकदार सुरक्षित पर्याय म्हणून सोन्याकडे वळतात, त्यामुळे सोन्याचे दर वाढतात. आपल्या पोर्टफोलिओमध्ये सोन्याचा समावेश असेल तर इक्विटीमधील घसरण भरून निघू शकते. जेव्हा बाजार 'ओव्हररिॲक्ट' करतो, तेव्हा सामान्य गुंतवणूकदार घाबरून दर्जेदार गुंतवणूक कमी किमतीत विकतात, नेमकी त्याच वेळी मोठे संस्थात्मक गुंतवणूकदार खरेदी करत असतात. जोपर्यंत तुम्ही तुमची गुंतवणुक विकत नाही, तोपर्यंत तुमचा तोटा केवळ कागदावर असतो, एकदा विक्री केली की तो कायमचा होतो.

व्हॉट्सॲप कॉलवर 'तुम्हाला अरेस्ट केले आहे' असे सांगून कोणीही अटक करू शकत नाही. अशा वेळी घाबरून न जाता कुटुंबाला विश्वासात घ्या आणि पोलिसांशी संपर्क साधा. तसेच म्युच्युअल फंडाच्या स्वॅप प्रणालीद्वारे पेन्शनचे नियोजन कसे करावे, याची सविस्तर माहिती नाईक यांनी दिली.

## परमपूजनीय सदगुरु आत्मा मालिक माऊली यांच्या दिव्य उपस्थितीमध्ये

# नर्मदा प्रदक्षिणा स्वागत दिंडी उत्साहात




**कोपरगाव : (समर्थ गांवकरी)**

नर्मदा परिक्रमा पूर्ण करून परतलेल्या आत्मा मालिक ध्यानपीठातील संतांच्या स्वागतासाठी कोपरगाव शहरात आयोजित करण्यात आलेली 'नर्मदा प्रदक्षिणा स्वागत दिंडी' आज मोठ्या जल्लोषात व भक्तिमय वातावरणात पार पडली. पंचक्रोशीतील तसेच नाशिक, मालेगाव परिसरातील हजारो भाविकांनी या दिंडी सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. ठरलेल्या मार्गानुसार साईबाबा कॉर्नर येथून सुरू झालेली ही दिंडी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, स्वामी समर्थ मंदिर मार्गे आश्रमात येऊन संपन्न झाली. संपूर्ण मार्गावर मंगल वाद्यांच्या गजरात आणि भक्तीमय वातावरणात हा सोहळा पार पडला.

या दिंडीचे मुख्य आकर्षण म्हणजे परमपूज्य आत्मा मालिक माऊली यांची दिव्य उपस्थिती होय. त्यांच्या दर्शनाचा लाभ उपस्थित हजारो भाविकांना झाला. तसेच नर्मदा परिक्रमा पूर्ण केलेल्या सर्वांचे संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांच्या वतीने प.पु.आत्मा मालिक माऊली व पायी नर्मदा परिक्रमा करणाऱ्या संत निजानंद महाराज.

संत अशोक महाराज, संत सार्थकानंद महाराज, अथर्वानंद महाराज, सुनील महाराज, विलास भामरे, सुरेश माळोदे, रामेश्वरी माई , ज्ञानेश्वरी माई, स्वरूपा माई, तपस्विनी माई, शोभा शेलार, ललिता भालरे, सुनीता काळे, आशा सोनवणे, प्रज्ञा मिश्रा, सुमन निकम, निर्मला लाटे, छाया मोटे व वंदना इंगळे यांच्यासह आदींचे व संतांचे पूजन व स्वागत करण्यात आले.

तसेच या मंगल प्रसंगी त्यांच्या हस्ते नर्मदा मातेचे जलपूजन करून संतांवर जेसीबीच्या सहाय्याने पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी आत्मा मालिक ध्यानपीठाचे ज्येष्ठ संत परमानंद महाराज, संत शांतिमाई, स्मृतिमाई, ध्यानीमाई, संत चांगदेव महाराज, विष्णुदास महाराज, प्रेमानंद महाराज,दत्तगिरी महाराज तसेच विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी उपाध्यक्ष बाळासाहेब गोरडे, विश्वस्त प्रदीप भंडारी, प्रकाश गिरमे व अन्य विश्वस्त उपस्थित होते. या भव्य दिंडी सोहळ्यात कोपरगाव शहरातील नागरिकांसह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## नगराध्यक्षा सुजाता येंड्रलवार यांच्या पाठपुराव्याला यश

**किनवट : (समर्थ गांवकरी)**



किनवट शहरातील शिवाजी नगर परिसरातील रेल्वे अंडर ब्रिज (RUB) येथे निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे उडणाऱ्या प्रचंड धुळीमुळे नागरिकांचे आरोग्य व दैनंदिन जीवन त्रस्त झाले होते. या गंभीर समस्येबाबत स्थानिक नागरिकांनी नगराध्यक्षा सुजाता येंड्रलवार यांच्याकडे वारंवार तक्रारी केल्यानंतर त्यांनी तत्काळ दखल घेत रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू केला. नगराध्यक्षा येंड्रलवार यांनी दिनांक ११ मार्च रोजी दक्षिण मध्य रेल्वेच्या हैदराबाद येथील जनरल मॅनेजर तसेच नांदेड विभागीय रेल्वे व्यवस्थापक (DRM) यांना लेखी पत्र पाठवून सदर अंडर ब्रिजवरील निकृष्ट कामाबाबत सविस्तर माहिती देत तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली होती. त्यानंतरही पाठपुरावा सुरू ठेवत त्यांनी दिनांक १४ मार्च रोजी ईमेलद्वारे संबंधित अधिकाऱ्यांकडे नागरिकांच्या समस्या आणि धुळीमुळे निर्माण झालेल्या आरोग्यविषयक धोक्यांबाबत सविस्तर गाऱ्हाणे मांडले. या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत रेल्वे प्रशासनाने दिनांक १७ मार्च रोजी अधिकृत पत्राद्वारे कामाची माहिती जाहीर केली. त्यानुसार, लेव्हल क्रॉसिंग क्रमांक १२ (कि.मी. ११७/२-३) येथील अंडर ब्रिजवर रस्त्याच्या पृष्ठभागाचे काम १८ मार्च ते २५ मार्च २०२६ दरम्यान हाती घेण्यात येणार असून या कालावधीत संबंधित रस्ता वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. पर्यायी मार्ग म्हणून RUB क्रमांक १४०A (सुभाष नगर अंडर ब्रिज) मार्गे वाहतूक वळविण्यात येणार आहे. या दुरुस्तीच्या कामामुळे शिवाजी नगर परिसरातील धुळीच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघण्याची शक्यता असून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. नगराध्यक्षा येंड्रलवार यांच्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाल्याचे स्पष्ट झाले असून या निर्णयामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, दीर्घकाळ चाललेल्या या समस्येपासून सुटका होणार असल्याने स्थानिक नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला असून नगराध्यक्षा सुजाता येंड्रलवार यांचे आभार व्यक्त केले आहेत. प्रशासनानेही कामाच्या कालावधीत योग्य सुरक्षा व्यवस्था व दिशादर्शक फलक लावण्याचे आश्वासन दिले असून नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत श्रमसंस्कार शिबिर संपन्न



**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

श्री गुरू गोबिंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदेड येथे राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत आयोजित विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिर ११ ते १६ मार्च २०२६ या कालावधीत उत्साहात पार पडले. शिबिरादरम्यान ग्रामस्वच्छता, रस्ते दुरुस्ती, साक्षरतेचे महत्त्व, आरोग्य शिबिर, वृक्षारोपण, पेंटिंग, वायरिंग, नळकाम तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. प्रशिक्षणार्थी व ग्रामस्थांना विविध विषयांवर मार्गदर्शन मिळावे यासाठी तज्ञ व्यक्तींना आमंत्रित करण्यात आले होते. राष्टसंत गुरुवर्य सतगुरू साईनाथ महाराज स्वच्छता दूत, महाराष्ट्र यांनी स्वच्छतेविषयी प्रबोधन केले. १७ मार्च २०२६ रोजी शिबिराचा समारोप झाला.

समारोप कार्यक्रमासाठी तहसील कार्यालय अर्धापूरचे तहसीलदार रेणुकादास देवणीकर हे प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात अशा उपक्रमांमुळे व्यक्तिमत्त्व विकास घडतो व समाजाप्रती असलेली बांधिलकी दृढ होते, असे सांगितले. तसेच प्रशिक्षणार्थ्यांनी नोकरीपेक्षा स्वतःचे उद्योग सुरू करण्यावर भर द्यावा, असे आवाहन करून त्यांचे मनोबल वाढवले. संस्थेचे उपप्राचार्य व्ही. डी. कंदलवाड यांनी महादेव पिंपळगाव येथील ग्रामस्थांचे सहकार्याबद्दल आभार मानले. तसेच प्रशिक्षणार्थी व कर्मचाऱ्यांनी शिबिर यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

शिबिराच्या निरोप समारंभाला गावातील सरपंच, उपसरपंच, माजी सरपंच, मंगल कार्यालयाचे अध्यक्ष, ग्रामस्थ, शिल्पनिदेशक व शिबीरार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे प्राचार्य एस. व्ही. सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रा. से. यो. कार्यक्रमाधिकारी डी. ए. पोतदार यांनी केले, तर आभार प्रदर्शन पी. बी. उभेदळ यांनी केले.

## बोगस एनजीओचा पर्दाफाश

**डांग:गुजरात : (समर्थ गांवकरी)**

डांग जिल्ह्यात पुन्हा एकदा बोगस एनजीओमार्फत आदिवासी शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. "जेरीको युनिव्हर्सल वर्ल्ड" नावाच्या संस्थेने आहवा तालुक्यातील मालेगाव परिसरातील शेतकऱ्यांना शेतीसाठी सबसिडीवर बोरिंग करून देण्याचे आमिष दाखवत प्रति लाभार्थी ₹21,800 प्रमाणे रक्कम उकळल्याचे समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ११ पेक्षा अधिक शेतकऱ्यांकडून लाखो रुपयांची वसुली करण्यात आली आहे. बोरिंग करून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते, मात्र प्रत्यक्षात कोणतेही काम करण्यात आले नाही आणि शेतकऱ्यांना पैसेही परत देण्यात आले नाहीत. त्यामुळे पीडित आदिवासी शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

## नांदेड जिल्हा कृषी व धान्य महोत्सवात विक्रमी उलाढाल

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

- नांदेड कृषी महोत्सव पोर्टलद्वारे www. nandedkrushimahotsav.in शेतमाल थेट विक्रीस चालना- जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी नांदेड आणि प्रकल्प संचालक, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 15 ते 17 मार्च 2026 या कालावधीत जिल्हास्तरीय कृषि व धान्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कृषि विद्यापीठ, कृषि विज्ञान केंद्र, हरिद्रा, रेशीम, मत्स्य विभाग, आणि शेतकरी, शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपन्या यांनी सक्रीय सहभाग घेतला. तसेच शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला थेट बाजारपेठ मिळावी आणि ग्राहकांना दर्जेदार शेतीमाल उपलब्ध व्हावा, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या 'जिल्हा कृषी व धान्य महोत्सव 2026' ला नांदेड जिल्ह्यातील व शहरातील जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवा मोंढा मैदानात रंगलेल्या या तीन दिवसीय महोत्सवात तब्बल 1 कोटी रुपये पेक्षा अधिक विक्रमी उलाढाल झाली असून, यामुळे शेतकऱ्यांच्या दर्जेदार उत्पादनास नागरिकांनी मोठ्या प्रमाणात पसंती मिळाली व शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळाला त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये व नागरिकांमध्ये आनंदाची भावना दिसुन आली.तसेच जिल्हा महोत्सव PMFME अतर्गत खरेदीदार विक्रेता संमेलनात 55 लक्ष रुपये किमतीचे खरेदी करार करण्यात आले. या महोत्सवाच्या तिन्ही दिवसांत ग्राहकांनी मोठयाप्रमाणात खरेदीसाठी सहभाग घेतल्यामुळे मध्यस्थांशिवाय थेट ग्राहकांना विक्री करण्यात आली असुन, शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल उत्पादनास योग्य मोबदला मिळाला आहे विविध प्रकारचे धान्य, कडधान्ये आणि प्रक्रियायुक्त पदार्थांचे स्टॉल्स,पाणलोट,जलतारा,नैसर्गिक शेतीचे मॉडेल तसेच ईलेक्ट्रीक पॉवर टिलर ठरले कृषी महोत्सवाचे आकर्षण.पौष्टिक तृणधान्य पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत बाजरी, राजगिरा, नाचणी, वरई, भगर यांसारख्या पौष्टिक तृणधान्यांपासून तयार केलेले विविध पदार्थ स्पर्धकांनी सादर केले. सदर स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ. सुरेखा कुलकर्णी (विभाग प्रमुख, होम सायन्स, केआरएम महिला महाविद्यालय, नांदेड) व प्रा. अलका पवळे (कृषी विज्ञान केंद्र, पोखर्णी) यांनी केले. प्रथम क्रमांक – सौ. सुनीता अशोक कावळे, रेनापूर, ता. भोकर (नाचणी व भगर लाडू) द्वितीय क्रमांक – सौ. मनीषा सुरेशराव कदम, नांदेड (भगर आप्पे व इडली) तृतीय क्रमांक – सौ. अर्चना विजय क्षीरसागर, नांदेड (नाचणी ढोकळा) तसेच सर्व विजेत्यांना व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. प्रथम क्रमांक – सौ. सुनीता अशोक कावळे, रेनापूर, ता. भोकर (नाचणी व भगर लाडू) द्वितीय क्रमांक – सौ. मनीषा सुरेशराव कदम, नांदेड (भगर आप्पे व इडली) तृतीय क्रमांक – सौ. अर्चना विजय क्षीरसागर, नांदेड (नाचणी ढोकळा) तसेच सर्व विजेत्यांना व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. तसेच बायोचार,ऊसा पीकातील AI तंत्रज्ञान मार्गदर्शन व शेतकरी शास्त्रज्ञ कार्यशाळा कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

# श्री क्षेत्र लिंगदेव येथे संस्कृती, श्रद्धा आणि एकोप्याचा उत्सव

## गुढी पाडव्याला पुन्हा रंगणार संगीत आखाडी (सोंगाचा पाडवा) परंपरेचा सोहळा

**अकोले तालुक्यातील लिंगदेव येथे भगवान लिंगेश्वरांचे जागृत देवस्थान असुन महाराष्ट्र शासनाकडून ब वर्ग तीर्थ क्षेत्र दर्जा प्राप्त झाला असुन महाराष्ट्रातील नामवंत देवस्थान म्हणून ओळखले जाते. अकोले तालुक्याचे आमदार डॉ.किरणजी लहामटे यांच्या विकास निधीतुन " भगवान लिंगेश्वर सांस्कृतिक भवन " साठी ७० लक्ष निधी मंजूर असुन काम प्रगती पथावर आहे . येथे सालाबाद प्रमाणे याही वर्षी मोठया उत्साहात साजरा होत आहे . लिंगेश्वर यात्रा उत्सव म्हणजे लिंगदेव पंचक्रोशीतील व तालुक्याच्या लोकांच्या आनंदाची पर्वणी . श्रद्धा व विश्वास नवसाला पावणारा श्री . भगवान लिंगेश्वर निरागर निखळ आनंद प्रत्येकाच्या ठायी ठायी दिसते . यावर्षीची हि पर्वणी आज चैत्र शुद्ध प्रतिपदा ( गुढीपाडवा ) शके १९४८ आज गुढीपाडवा या दिवशी यात्रोत्सव सुमांगल्य पूर्ण रूपाने संपन्न होत आहे .महाराष्ट्रात नावाजलेली व नाविण्यपूर्ण असलेली धार्मिक सांस्कृतिक आणि सामाजिक एकतेचा एकतेचा संदेश देणारे धर्मोत्वासाचे पर्व आजही २६ व्या शतकातही स्थान महात्म्य व काल महात्म्य टिकुन आहे . याचे कारण अत्यंत जागृत व जावल्य असे लिंगेश्वराचे स्थान व लिंगेश्वरावर असलेली अपार श्रद्धा हे होय .**



### श्री भगवान लिंगेश्वर देवस्थान ट्रस्टी

श्री लिंगेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष डी. बी. फापाळे, उपाध्यक्ष दत्तु कानवडे, सचिव पंढरीनाथ जाधव , खजिनदार एकनाथ कानवडे तसेच विश्वस्त रामकृष्ण कानवडे, दत्तु निवृत्ती फापाळे, सदाशिव कानवडे, सुरेश कानवडे, एकनाथ कोरडे, सुदाम हांडे, भाऊसाहेब हाडवळे, भाऊसाहेब पवार, हरिभाऊ मंजुळ फापाळे, बाळशिराम आढाव, निवृत्ती आंबरे, उत्तम हाडवळे, बन्शी कानवडे, सुनील शहा, कैलास फापाळे व व्यवस्थापक प्रवीण सोळसे अगदी चोख कामगिरी पार पाडत आहे.

**लिंगदेव : (समर्थ गांवकरी)**

भल्या पाहटे पासुन धार्मिक विधी सुरु होतात पाहाटे ४ ते ५ महापुजा , ५ ते ६ मुगुट चढविणे , ६ ते ७ वस्र अलंकार चढविणे ,७ ते ८ महाआरती तसेच भव्य शोभा यात्राने यात्रेचे रंगत वाढत जाते .गेल्या सात वर्षापासून लेझीम या आपल्या पारंपारिक खेळाला विशेष महत्व देउन लिंगेश्वर देवस्थान ट्रस्टने राज्यस्तरीय पुरुष व महिला लेझीम स्पर्धेचे आयोजन केले आहे . हि लेझीम स्पर्धाही या यात्रेची विशेष असे आकर्षण ठरत आहे . या लेझीम स्पर्धेसाठी बक्षिसे ठेवण्यात आली आहे .महाराष्ट्रातील नामवंत रील स्टार ह्या यात्रेत सहभागी होऊन यात्रेची शोभा वाढवत आहे.

दशावतारी कला आज महाराष्ट्रात नामशेष होण्याच्या मार्गावर असताना लिंगदेवकरांनी ती जोपासली , वाढविली , जपुन ठेवुन त्यामध्ये चैतन्य व संस्कृतीच्या पाऊल खुणा येथे पदोपदी उमटताना दिसुन येतात .अशी चालते लिंगेश्वरांची संगीत आखाडी ताल से ताल ... कदम से कदम बाजू से बाजू ...... महादेवाची स्वारी येत आहे , गलबत मत करो,,,,,,, च्या ललकारीने सनईच्या सुरात व तुतारीच्या निनादात डफ , संबळ हलगी व नादमधुर सूर व डफावरील पहीली थाप पडताच अंग शहारलं जात , सर्वांची पाऊले थिरकतात पात्र घेणारी व्यक्ती तालाच्या ठेक्यावर नाचतात , हे नाचणे फुकट नाही हो हजारो रुपये लिलावात बोली लावुन तो लिलाव घ्यावा लागतो व आपले कौशल्य दाखविले जाते .

विद्युत रोषनाई , फटाक्याची आतिषबाजी , वाद्याच्या गजरात सूत्रधाराची स्वारी अवतरते तत्पूर्वी आखाडीचे उद्घाटन व दीपप्रज्वलनाने सुरुवात होते . उद्घाटन करण्यासाठी देवस्थानाला आर्थिक निधी मिळतो . लिंगदेव हे गाव धार्मिक व सांस्कृतिक परंपरांसाठी संपूर्ण परिसरात ओळखले जाते. मुळा नदीच्या काठावर वसलेले हे गाव भगवान श्री लिंगेश्वर महादेवाच्या प्राचीन मंदिरामुळे तसेच गुढीपाडव्याच्या निमित्ताने भरविण्यात येणाऱ्या पारंपरिक यात्रेमुळे प्रसिद्ध आहे. या यात्रेचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे शंभर वर्षांहून अधिक काळापासून जपली गेलेली संगीत आखाडी ही अनोखी लोकपरंपरा. अनेक पिढ्यांनी श्रद्धा, उत्साह आणि अभिमानाने जपलेली ही परंपरा आजही तितक्याच जोमाने साजरी होत असून गावाच्या सांस्कृतिक ओळखीचा अविभाज्य भाग बनली आहे.

गुढीपाडवा म्हणजे मराठी नववर्षाचा प्रारंभ. या शुभदिनी लिंगदेव येथे भगवान श्री लिंगेश्वर महादेवाची यात्रा भरते आणि संध्याकाळी गावात संगीत आखाडीचा रंगतदार सोहळा सुरू होतो. ढोल, ताशे, हलगी आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात गावातील तरुण तसेच ग्रामस्थ रामायण, महाभारत आणि पुराणातील विविध पात्रांची सोंगे धारण करून नृत्य आणि अभिनय सादर करतात. रंगीबेरंगी वेशभूषा, मुखवटे आणि पारंपरिक सादरीकरणामुळे वातावरणात वेगळाच उत्साह निर्माण होतो. अनेकदा हा कार्यक्रम रात्रभर चालतो आणि परिसरातील हजारो भाविक व रसिक याचा आनंद घेतात.

**सोंगांच्या ( बोहडा ) मानासाठी लिलावाची परंपरा -**

या आखाडीचे सर्वात वैशिष्ट्यपूर्ण अंग म्हणजे विविध सोंगांच्या मानासाठी होणारा लिलाव. प्रत्येक पात्राचा मान मिळवण्यासाठी गावातील भूमिपुत्र उत्साहाने बोली लावतात. या लिलावातून जमा होणारी रक्कम देवस्थान, यात्रा आणि धार्मिक कार्यक्रमांच्या व्यवस्थेसाठी वापरली जाते. त्यामुळे ही परंपरा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम न राहता गावातील सामाजिक एकतेचे आणि धार्मिक श्रद्धेचे प्रतीक ठरली आहे.

**यात्रेच्या लिलावात यंदा १६ लाखांहून अधिक बोली**

यंदाच्या गुढीपाडव्याच्या यात्रेच्या पार्श्वभूमीवर झालेल्या लिलावाने नवा विक्रम प्रस्थापित केला. भगवान श्री लिंगेश्वर मंदिराच्या सभामंडपात पार पडलेल्या लिलावात तब्बल १६ लाखांहून अधिक रकमेची बोली लागली. लिलावाचे माईकद्वारे पुकार करण्यात आले होते तसेच त्याचे थेट प्रक्षेपणही करण्यात आले. त्यामुळे देश-विदेशात नोकरी, व्यवसाय किंवा सैन्य सेवेत असलेले गावातील भूमिपुत्रही या लिलावात सहभागी झाले आणि या वर्षीचा लिलाव विक्रमी ठरला.

लिलावाची सुरुवात - भगवान श्री लिंगेश्वर नंदादीप (५६ किलो तेल) या मानाने झाली. हा मान युवा उद्योजक प्रमोद भाऊसाहेब पवार यांनी ६६ हजार रुपयांत मिळविला. दत्त मंदिर नंदादीपचा मान दत्तु माधव कानवडे यांनी ३७ हजार रुपयांत घेतला, तर नवीन मूर्ती नंदादीपचा मान भिवसेन कृष्णा कानवडे यांनी १५ हजार रुपयांत मिळविला. भगवान लिंगेश्वर अभिषेकाचा मान सुरेश रामभाऊ पवार यांनी ३७ हजार रुपयांत घेतला. वस्त्रअलंकाराचा मान विक्रम सरुजी पवार यांनी घेतला. महाआरतीचा मान ऋषिकेश दगडू पवार यांनी ७२ हजार रुपयांत मिळविला.

**यात्रा उद्घाटन व दीप प्रज्वलन**

यात्रेच्या आखाडीचे उद्घाटन ज्ञानगंगा वाचनालय अध्यक्ष सदाशिव भीमाजी कानवडे यांनी ५२ हजार रुपयांत घेतले. दीप प्रज्वलनाचा मान सरपंच अमित राणेश घोमल यांनी ५५ हजार रुपयांत बोली लावून मिळविला.

**प्रमुख सोंगांसाठी मोठ्या बोली** - संगीत आखाडीतील प्रमुख पात्रांसाठीही मोठ्या बोली लागल्या. सूत्रधारा- मुख्याध्यापक एकनाथ तुळशीराम फापाळे यांनी ८० हजार रुपयांत घेतला. हिरण्यकश्यपु - जीवन सुभाष होलगीर यांनी ८० हजार रुपयांत घेतले. रावण- बन्सी म्हातारबा होलगीर यांनी ७६ हजार रुपयांत मिळविला. भीम - भीमा बाळा होलगीर यांनी ५४ हजार रुपयांत घेतले. यमराज - विष्णु केरू होलगीर यांनी ४० हजार रुपयांत मिळविला. इंद्रजीत- अर्णव अमोल फापाळे यांनी ९२ हजार रुपयांत घेतला. कृष्ण-भीष्म-अर्जुन - बाळासाहेब म्हातारबा होलगीर यांनी ६० हजार रुपयांत घेतले. कर्ण-श्रीकृष्ण-अर्जुन - बाळासाहेब रामचंद्र कानवडे यांनी ३३ हजार रुपयांत घेतले. वेताळ - इंजि. राहुल मनोहर फापाळे यांनी ४६ हजार रुपयांत घेतले. खंडेराय - अनिल पूजा शिंदे यांनी ५१ हजार रुपयांत घेतला. वाघ्या-मुरळी - भिमाशंकर रखमा हाडवळे यांनी ५५ हजार रुपयांत घेतले तर घटोत्कच - धोंडीभाऊ विष्णू कानवडे यांनी २६ हजार रुपयांत घेतले व अनेक रामायण महाभारतातील पात्रे गावातील व्यक्तींनी घेतलेली आहेत.

**कुस्ती हंगामा व लेझीम स्पर्धा-**

यात्रेनिमित्त भव्य कुस्ती हंगामाचे आयोजन करण्यात आले असून प्रथम पारितोषिक १६,१५१ रुपये ठेवण्यात आले आहे. तसेच राज्यस्तरीय खुल्या लेझीम स्पर्धेत प्रथम ८,१५१, द्वितीय ७,७७७, तृतीय ५,१५१, चतुर्थ ४,१५१, पाचवा ३,१५१ रुपये व स्मृतिचिन्हे देण्यात येणार आहे. परगावच्या उर्वरित संघांना प्रत्येकी २,५०१ रुपये उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात येणार आहे.

**महाप्रसाद व सांस्कृतिक कार्यक्रम** - सर्व यात्रेकरूं करिता सायंकाळी ७ ते रात्री ११ या वेळेत महाप्रसाद अन्नदान सेवा डॉ.अभिजित कोरडे यांच्या कडून ठेवण्यात आली आहे. पाडव्याच्या दिवशी सकाळी ९ ते ११ या वेळेत अगस्ती विद्यालय अकोले येथील विद्यार्थ्यांचा ढोल-ताशा कार्यक्रम होणार आहे. तसेच ११ ते १२ या वेळेत लिंगेश्वर आदर्श विद्यालय ,लिंगेश्वर हायस्कुल व आर कानवडे जुनिअर कॉलेज ,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लिंगदेव व फापाळेवाडी यांच्याकडून विविध सांस्कृतिक कार्यक्रम मंदिर परिसरात सादर केले जाणार आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही गुढीपाडव्याच्या दिवशी हजारो भाविक, शिवभक्त आणि सांस्कृतिक रसिक लिंगदेव येथे दाखल होणार आहेत. महाराष्ट्रासह देशभरातून तसेच परदेशातूनही अनेक भूमिपुत्र या यात्रेसाठी गावात येतात. त्यामुळे लिंगदेव यात्रेची कीर्ती आज देश-विदेशात पोहोचली आहे.शंभर वर्षांहून अधिक काळ जपली गेलेली ही संगीत आखाडी परंपरा केवळ धार्मिक उत्सव नसून श्रद्धा, संस्कृती, एकोप्याची भावना आणि लोककलेचा जिवंत वारसा आहे. बदलत्या काळात अनेक परंपरा हरवत असताना लिंगदेवच्या ग्रामस्थांनी ही परंपरा जिवंत ठेवली आहे, हीच या गावाची खरी ओळख ठरते. ग्रामपंचायत कडून विशेष सहकार्य - ग्रामविकास अधिकारी राजेंद्र पावसे, सरपंच अमित घोमल, उपसरपंच बजरंग ढोकरे, ग्रामपंचायत सदस्य राजुबाई गंगाराम फापाळे, पुष्पा विठ्ठल कानवडे, विजय उघडे , प्रमिला बाळचंद कानवडे, सीमाबाई उघडे, सुभाष होलगीर, रोहिणी होलगीर, चैतन्य आढाव, कल्पना हरिभाऊ फापाळे, शिपाई दत्तु दादाभाऊ फापाळे, नवनाथ सूर्यवंशी, संगीता बर्डे, संदीप गोडे आदी पाणी ,स्वच्छता साठी विशेष सहकार्य करण्यात येत आहे .

**ग्रामस्त सहकार्य :** पोलिस पाटील मंगल गणेश पवार, गणेश पवार,ह.भ प परशुराम महाराज कानवडे,शिवसेना नेते प्रभाकर फापाळे,देवराम फापाळे ,बन्शी होलगीर ,विलास फापाळे सर , नानासाहेब फापाळे ,तुषार फापाळे ,एकनाथ फापाळे सर ,मैत्रेय ट्रव्हल्स चाकणचे संचालक भाऊसाहेब घोमल ,सचिन कानवडे , शरद पवार ,इंजी अमोल फापाळे ,इंजी जालिंदर कानवडे ,इंजी प्रताप कानवडे ,भाऊसाहेब फापाळे ,अंकुश फापाळे ,शैलेश कानवडे ,सागर फापाळे ,पत्रकार शुभम फापाळे ,गोविंद कोरडे ,अनिल हांडे ,राधाकिसन फापाळे ,विक्रम पवार ,भाऊसाहेब बर्डे ,सोमनाथ पवार ,यमनाजी कानवडे ,अशोक कोरडे ,विशाल कोरडे ,सोमनाथ कानवडे ,मुंबई पोलीस राजेंद्र कानवडे ,रोहिदास कानवडे ,काशिनाथ कानवडे ,मनोज कानवडे,देवस्थान पुजारी दास काका ,कारभारी कानवडे गुरुजी ,बाबुराव कोरडे ,पोपट हाडवळे ,जानकीराम हाडवळे , जितेंद्र कानवडे ,अर्जुन होलगीर , संजय रामभाऊ फापाळे ,आनंदा फापाळे सर,उल्हास फापाळे ,विठ्ठल कानवडे ,ऋषी कानवडे ,अजित कानवडे ,सचिन सूर्यवंशी ,सोमनाथ कोल्हाळ ,उत्तम पवार ,रामकृष्ण हांडे ,सोमनाथ हांडे गोपाल हाडवळे ,संदीप हाडवळे डॉ सचिन हाडवळे ,प्रमोद जाधव ,अरुण फापाळे ,राजेंद्र फापाळे ,अशोक फापाळे ,सुरेश पवार ,भाऊ कानवडे ,विष्णु हाडवळे ,सुनील कानवडे ,वसंत हाडवळे ,शरद कानवडे,सुरेश कानवडे ,पो.कॉ दीपक होलगीर ,प्रदीप होलगीर ,मुंबई पोलीस भीमाशंकर होलगीर ,मेजर राधाकृष्ण होलगीर ,ग्रामसुरक्षा दल लिंगदेव, येडुमाता तरुण मित्र मंडळ, गणेश मित्र मंडळ, बोल्हाई माता मित्र मंडळ, देवीआई मित्र मंडळ, कळंबजाई मित्र मंडळ, वर्सुआई मित्र मंडळ, ठाकरवाडी मित्र मंडळ, नागेश्वर मित्र मंडळ, नाशिक, पुणे, मुंबई, छत्रपती संभाजी नगर, अहिल्यानगर मित्र मंडळ,माळवाडी मित्र मंडळ, लिंगेश्वर आदर्श विद्यालय लिंगदेव व लिंगेश्वर हायस्कुल व आर.आर कानवडे ज्युनिअर कॉलेज लिंगदेव विद्यार्थी,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी , लिंगदेव गावातील तरुण, ग्रामस्थ व महिला भगिनी आदी यात्रा निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी परिश्रम घेत आहे.

# संगमनेर ॲसिड हल्ला प्रकरण गंभीर

## उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची पोलीस प्रशासनाला तातडीच्या कारवाईची सूचना

- ॲसिड विक्रीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर
- सर्वोच्च न्यायालयाच्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी अनिवार्य

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

संगमनेर (जि. अहिल्यानगर) येथे १२ वर्षीय अल्पवयीन मुलीवर झालेल्या ॲसिड हल्ल्याच्या अत्यंत गंभीर घटनेची विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दखल घेतली असून, या प्रकरणात कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी कठोर आणि तातडीने कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी नाशिक परिक्षेत्राच्या विशेष पोलीस महानिरीक्षकांना दिले आहेत. दि. १७ मार्च २०२६ रोजी घडलेल्या या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे. संबंधित प्रकरणी संगमनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास जलदगतीने पूर्ण करण्याची गरज डॉ. गोऱ्हे यांनी अधोरेखित केली आहे. डॉ. गोऱ्हे यांनी आपल्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, आरोपीचा शोध घेण्यासाठी आंतरजिल्हा विशेष तपास पथक गठित करून वैज्ञानिक व तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास करावा. घटनास्थळावरील पंचनामा, फॉरेन्सिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज, कॉल डिटेल रेकॉर्ड (CDR) आदी पुरावे तत्काळ संकलित करण्याचेही त्यांनी निर्देश दिले आहेत. तसेच आरोपीची ओळख पटविण्यासाठी टेस्ट आयडेंटिफिकेशन परेड घेणे आणि पीडितेचा जबाब दंडाधिकाऱ्यासमोर नोंदविणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. या प्रकरणात वैद्यकीय अहवाल (MLC), जखमांची तीव्रता आणि हल्ल्याचा हेतुपुरस्सरपणा सिद्ध करणारे पुरावे भक्कमपणे सादर करण्यावरही त्यांनी भर दिला आहे. प्रकरण जलदगती न्यायालयात चालवून अनुभवी विशेष सरकारी वकील नेमण्याची कार्यवाही करावी, असेही त्यांनी सुचविले आहे. याशिवाय, सर्वोच्च न्यायालयाच्या Laxmi Vs. Union of India या प्रकरणातील निर्देशांनुसार ॲसिड विक्री व साठ्याचे काटेकोर नियमन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.



श्रीगोंदा : वाढत्या उन्हाच्या तीव्रतेच्या पार्श्वभूमीवर मुक्या प्राण्यांची तहान भागवण्यासाठी तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान संचलित सोनिया गांधी पॉलिटेक्निक, श्रीगोंदा यांच्या वतीने स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ तालुक्यातील विविध वनक्षेत्रांतील कोरडे पडलेले पाणवठे पाण्याने भरून काढण्यात आले. हा उपक्रम नागवडे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे आणि अनुराधाताई नागवडे यांच्या संकल्पना व प्रेरणेने साकार झाला. पर्यावरण संरक्षण आणि वन्यजीव संवर्धनाची गरज ओळखून या मोहिमेला त्यांनी सक्रिय पाठबळ दिले.

## थोडक्यात बातम्या...

### नाशिक गुन्हे शाखेने अशोक खरात उर्फ कॅप्टन या भोंदूबाबाला केली अटक

नाशिक (स. गांवकरी) : एका महिलेला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर बलात्कार केल्याप्रकरणी नाशिक गुन्हे शाखेने बुधवारी पहाटे अशोक खरात उर्फ कॅप्टन या भोंदूबाबाला अटक केली. अशोक खरात हा नावाजलेला कॉस्मोलॉजी एक्स्पर्ट आणि अंकशास्त्रज्ञ होता. अनेक बडे राजकारणी, उद्योगपती आणि सेलिब्रिटी अशोक खरात याच्याकडून मार्गदर्शन घ्यायचे. त्यामुळे अशोक खरात याला बलात्काराच्या आरोपाखाली अटक झाल्याने एकच खळबळ उडाली. अशोक खरात याच्याविरुद्ध आतापर्यंत एकाच महिलेने तक्रार दाखल केल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली. अशोक खरात आणि राजकारण्यांचे लागेबांधे असल्याने त्याची जोरदार चर्चा रंगली आहे. खरात यास न्यायाल्यात हजर केले असता. त्याला न्यायालयाने २४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. खरातच्या अटकेनंतर पोलिसांनी त्याच्या कॅनडा कॉर्नर परिसरातील कार्यालयावर छापा टाकला असता. या छाप्यात महत्त्वाचे पुरावे आणि काही धक्कादायक व्हिडीओ सापडले आहेत. यात त्याचा धार्मिक विधीच्या नावाखाली स्वतःच्या ऑफिसमध्येच एका महिलेशी अश्लील चाळे करतानाचा व्हिडीओ समोर आला आहे. पुढील तपास युनिट १ करत आहे.

### पुरवठा विभागातील अनियमिततेवर जिल्हा प्रशासनाचा कडक पवित्रा

नाशिक (स. गांवकरी) : नायगाव तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागात सुरू असलेल्या कथित अनियमिततेबाबत जिल्हा प्रशासनाने अखेर कडक भूमिका घेत सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. दैनिक गावकारी व अन्य पेपरमध्ये 'प्रसिद्ध झालेल्या वृत्ताची गंभीर दखल घेत जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी संबंधित प्रकरणाचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे. प्राप्त माहितीनुसार, नायगाव तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात एका खासगी व्यक्तीकडून शासकीय कामकाज करून घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला होता. विशेष म्हणजे संबंधित व्यक्ती कोणतीही अधिकृत नियुक्ती नसताना गेल्या आठ वर्षांपासून कार्यालयात वावरत असल्याची बाब समोर आली होती.

## स्तुत्य उपक्रम : टाकाऊपासून टिकाऊ–विद्यार्थ्यांची गोधडी निर्मिती!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**




केळुंगण येथील जय भवानी माता विद्यालयात विद्यार्थ्यांनी कला शिक्षणासोबत विविध उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग नोंदवला. याचाच एक भाग म्हणून "टाकाऊपासून टिकाऊ" या संकल्पनेवर आधारित गोधडी शिवण्याचा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, स्वावलंबन आणि पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण झाली. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. उकिर्डे एस. बी. तसेच कला शिक्षक श्री. बोंबले आर. एन. यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यालयाचे संस्थाप्रमुख श्री. जाधव आर. एस. (दादा) यांनी विद्यार्थ्यांच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग घेत मार्गदर्शन केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा ठरला.

## क्रांतीवीर बिरसा मुंडा १५० व्या जयंती औचित्याने कार्यशाळा

### पद्मश्री राहीबाई पोपेरे यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**अकोले : (समर्थ गांवकरी)**



क्रांतीवीर बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसेच अगस्ती महाविद्यालय, अकोले संयुक्त विद्यमाने अगस्ती महाविद्यालयात दि. १ एप्रिल २०२६ रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. भास्कर शेळके यांनी दिली. या कार्यशाळेचे उद्घाटन बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे यांच्या हस्ते होत आहे.

सहाय्यक कुलसचिव डॉ.अजय ठुबे, जनसंपर्क विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या निवेदनानुसार होणाऱ्या या कार्यशाळेत अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व संलग्न महाविद्यालयातील प्रतिनिधी तसेच विद्यापीठातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. आदिवासी भागातील शाळा, आश्रमशाळा, संगमनेर तालुका संलग्न महाविद्यालये तसेच जिल्ह्यातील संलग्न महाविद्यालयातील प्रतिनिधींचा कार्यशाळेत सहभाग असणार आहे. ग्रामीण आदिवासी भागातील कुपोषणाचे अधिक प्रमाण लक्षात घेता धोरणात्मक उपाय तसेच आदिवासी भागातील वनौषधी आणि रानभाज्या यासंदर्भात जनजागृतीसाठी माहिती दिली जाणार आहे. आदिवासी पाड्यातील विविध सांस्कृतिक नृत्य प्रकारांचे सादरीकरण देखील अंतर्भूत असणार आहे. कार्यशाळेकरिता उल्लेख केलेल्या प्रभागातील संलग्न महाविद्यालये तसेच शालेय प्रतिनिधींनी आवर्जून सहभाग नोंदवावा असे आवाहन अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारी विश्वस्त मा. आ. वैभव पिचड, कायम विश्वस्त गिरजाजी जाधव , स्वीकृत विश्वस्त मधुकर सोनवणे, सुरेश कोते, संपतराव वैद्य, अध्यक्ष सुनील दातीर, सेक्रेटरी सुधाकर देशमुख, खजिनदार धनंजय संत, सर्व कार्यकारिणी सदस्य, शिक्षणाधिकारी संपतराव मालुंजकर यांनी केले आहे.

## अहिल्यानगरची कन्या ठरली पहिली महिला कार्डिओलॉजिस्ट

### पुण्यात उच्च शिक्षणासाठी निवड!



**अकोले: (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्ह्यातील व अकोले तालुक्यातील डॉ. देवयानी विजय आरोटे (MBBS, M.D. General Medicine) हिची कार्डिओलॉजी या सुपर स्पेशालिटी शाखेत उच्च शिक्षणासाठी पुणे येथे निवड झाली असून, ती या भागातील पहिली महिला कार्डिओलॉजिस्ट ठरणार आहे. डॉ. देवयानी आरोटे हिने आपले प्राथमिक शिक्षण वर्का इंग्लिश मीडियम स्कूल, अहिल्यानगर येथे पूर्ण केले, तर माध्यमिक शिक्षण रेसिडेन्शियल कॉलेज, अहिल्यानगर येथे घेतले. त्यानंतर पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील मेडिकल फाउंडेशन येथून एमबीबीएस पदवी संपादन केली. पुढे तिने धुळे येथील मेडिकल कॉलेजमधून एम.डी. जनरल मेडिसिन हे उच्च शिक्षण पूर्ण केले. लहानपणापासूनच कार्डिओलॉजी विषयाची आवड असल्याने या क्षेत्रात उच्च शिक्षण घेण्याचे ध्येय तिने निश्चित केले होते. तिची पुणे येथे सुपर स्पेशालिटी अभ्यासक्रमासाठी झालेली निवड ही तिच्या चिकाटी व मेहनतीचे फलित असून, संपूर्ण परिसरासाठी अभिमानास्पद व प्रेरणादायी ठरली आहे. या यशामागे तिचे वडील श्री. विजय आरोटे (मुख्याध्यापक, जानकीबाई आपटे मूकबधिर माध्यमिक विद्यालय, अहिल्यानगर) तसेच संपूर्ण आरोटे कुटुंबियांचे मार्गदर्शन व पाठबळ लाभले. डॉ. देवयानी आरोटे हिचे हे यश विशेषतः मुलींसाठी उच्च शिक्षण घेण्याची प्रेरणा देणारे ठरत असून, तिच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

भगवान श्री लिंगेश्वर महादेव यात्रा उत्सव व गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा

पर्यटन क्षेत्रातील एक विश्वसनीय नाव **इमेज हॉलिडेज**

उपलब्ध सेवा - रेल्वे बुकिंग / विमान बुकिंग / हॉटेल बुकिंग / चारधाम यात्रा / अमरनाथ यात्रा / अष्टविनायक दर्शन / नर्मदा परिक्रमा / पेसा ग्रामपंचायत सहल सर्व प्रकारच्या सहलींचे आयोजन ,आमच्याकडे १४ ,१७ ,२० सीटर ५० सीटर एसी, नॉन एसी स्लिपर कोच बसेस शुभमंगल कार्य व धार्मिक यात्रेसाठी भाड्याने मिळेल.



प्रोप्रा.श्री. हरिभाऊ मंजुळ फापाळे
कार्याध्यक्ष युवक राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ,अकोले
सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई,अकोले तालुका
विश्वस्त, भगवान लिंगेश्वर देवस्थान ट्रस्ट, लिंगदेव
प्रोप्रा. राधाकिसन मंजुळ फापाळे
प्रोप्रा – सौ.कल्पना हरिभाऊ फापाळे
सदस्या, ग्रामपंचायत लिंगदेव



इमेज हॉलिडेज / श्रमिक ऑटोमोबाईल्स - रासने कॉम्प्लेक्स, कारखाना रोड, अकोले मु/पो, ता. अकोले, जि. अहिल्यानगर
मोबा. ९३७१८०६०८३ / ९९२१६४२४६८ / ९६५७६२३५१५

स्मार्ट एंटरप्राजेस ,संगमनेर

शाश्वत व समृद्ध शेतकरी.. अंतिम ध्येय !!..शेतीला द्या आधुनिक तंत्रज्ञानाची साथ..
आम्ही कृषी क्षेत्रात गेल्या १० वर्षापासून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून
१००% शेतकऱ्यांना समाधानी ठेवण्यात यशस्वी झालो आहोत.

स्मार्ट जिथे, सुरक्षा तिथे..!

सर्व प्रकारचे डिओल ऑटो स्विच, सेमी ऑटो स्विच, ड्रायरन ऑटो स्विच, सिंगल फेज ऑटो स्विच,
मोबाईल ऑटो स्विच व सर्व प्रकारचे डिजिटल स्टार्टरचे उत्पादक

पत्ता – खातोडे लॉन्स अकोले रोड, कसारा दुमाला , संगमनेर ४२२६०५
मो नं – ९९२१९५११५० / ७७२०००८७८०

लिंगेश्वर महादेव यात्रा उत्सव

आद्रतो ॲग्रो मॉल

लिंगदेव, ता. अकोले,जि.अ. नगर

प्रोप्रा. अनिल राधुजी हांडे ९७६५४६४६८१
प्रोप्रा. आशुतोष शेटे ९५९५९४३६००

....लिंगेश्वर प्रसन्न....

गुढीपाडव्याच्या पावन निमित्ताने आग्रहाचे निमंत्रण

आपणांस कळविण्यात अत्यंत आनंद होत आहे की,

मु. पो. लिंगदेव, ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथे
दि.१९ मार्च २०२६ रोजी – वेळ : सायंकाळी ७:०० वा.
गुढीपाडव्याचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.
या दिवशी रामायण व महाभारताच्या धरतीवर आधारित

पारंपारिक सोंग (पात्रांचे नृत्य व पवित्रा)

सादर करण्यात येणार आहे.
कृपया सर्वांनी संध्याकाळी ६:३० वाजता उपस्थित राहावे.

- कलाकार मंडळी -
सूत्रधार – प्रा . एकनाथ तुळशीराम फापाळे
विदूषक – श्री. संदीप बाळासाहेब फापाळे
सरस्वती – श्री. नानासाहेब रामदास फापाळे
गणपती – तुषार मारुती फापाळे



सर्वांनी लिंगेश्वराचे दर्शन घेऊन
या सुंदर आखाडी सोंगांचा आनंद घ्यावा, ही नम्र विनंती
आपली उपस्थिती आम्हांस लाभावी हीच अपेक्षा..

लिंगेश्वर महादेव यात्रा उत्सव

सर्व शिवभक्तांचे सहर्ष स्वागत

मैत्रेय ट्रॅव्हल, चाकण



सदस्य रोटरी क्लब, चाकण
मा. भाऊसाहेब घोमल मित्र मंडळ,
लिंगदेव, ता. अकोले, जि. अ.नगर
श्री. भाऊसाहेब रोहिदास घोमल
९९२११६१०१०

श्री लिंगेश्वर महादेव यात्रा उत्सव

सर्व शिवभक्तांचे हार्दिक स्वागत!

गुरुवार दि. १९/०३/२०२६ रोजी

ढोल ताशा पथक कार्यक्रम /शालेय कार्यक्रम / भव्य लेझीम स्पर्धा
अगस्ती विद्यालय ढोल ताशा पथक, अकोले
सकाळी ०९ ते १० वा / सकाळी १० ते ११ वा पर्यंत / दुपारी १२ ते ०३ वा पर्यत

महाराष्ट्रातील ख्यातनाम संगीत आखाडी कार्यक्रम

सायंकाळी ०७ ते सकाळी ०७ वाजे पर्यंत

शनिवार दिनांक – २०/०३/२०२५ रोजी दु. ४ ते ६ वा.
महाराष्ट्रातील प्रसिद्ध कुस्त्यांचा जंगी हंगामा

-: आपले नम्र :-
श्री. लिंगेश्वर महादेव व मारुती देवस्थान ट्रस्ट लिंगदेव
समस्त ग्रामस्त मंडळी लिंगदेव
श्री .लिंगेश्वर देवस्थान ट्रस्ट कार्यालय लिंगदेव
फोन. (०२४२४) २२१०७४ / मोबा. ९९२२२४३१४५ / ८८३०१७१४०५
web.lingeshwar.org.in

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# बालरंगकर्मी योजना राबविणारी महानगरपालिका

**ठाणे: (समर्थ गांवकरी)**



ठाणे महानगरपालिका व साहिल आर्ट मोशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'बालरंगकर्मी' योजनेअंतर्गत तयार करण्यात आलेल्या 'एका बटरची बेटर गोष्ट' या लघुपटाचे अनावरण उत्साहपूर्ण वातावरणात आज महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे करण्यात आले. ठामपा शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी अशा प्रकारची बालरंगकर्मी योजना राबविणारी ठाणे महानगरपालिका महाराष्ट्रातील एकमेव महानगरपालिका असल्याचे सांगत महापौरांनी सर्व बालरंगकर्मींचे कौतुक केले. या कार्यक्रमास उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, अतिरिक्त आयुक्त (1) संदीप माळवी व अतिरिक्त आयुक्त (2) प्रशांत रोडे, उपायुक्त डॉ.मिताली संचेती, नगरसेवक मुकेश मोकाशी, प्रशांत जाधवर, गटअधिकारी संगीता बामणे, बालकलाकार श्रेयस थोरात आदी उपस्थित होते.

एका बटरची बेटर गोष्ट हा लघुपट पाहिल्यावर त्यातील कथा ही माझ्या लहानपणाशी मिळतीजुळती असल्याचे भासले, लहानवयात कष्ट करुन आज इथपर्यत पोहचलो असल्याचे सभागृह नेते हणमंत जगदाळे यांनी नमूद केले. तर कोणंतही काम हे लहानकिंवा मोठं नसते. ते प्रामाणिकपणे करण महत्वाचे असल्याचे सांगत मी ही पाचवीत असताना कंदील तयार करुन ते आजूबाजूच्या लोकांना पाच रुपयांमध्ये विकत असल्याचे उपमहापौर कृष्णा पाटील यांनी नमूद केले. ठाणे महानगरपालिका नेहमीच चांगल्या उपक्रमांना सहकार्य करत असतात. ठाणे महानगरपालिका शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना भविष्यात संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी विविध उपक्रम घेत असते. एका बटरची बेटर गोष्ट या लघुपटात सर्व विद्यार्थ्यांनी उत्तम अभिनय केला असून भविष्यात यातून नक्कीच कलावंत घडतील असा विश्वास अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी यांनी नमूद केले. तर अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करुन त्यांना शुभेच्छा दिल्या व साहिल मोशन आर्टचे मंगेश देसाई यांचे अभिनंदन केले. बालरंगकर्मी योजनेचे हे चौथे वर्ष आहे आणि या चौथ्या वर्षात आपण लघुपटाची निर्मिती केली आहे. ठाणे महानगरपालिकेचे विद्यार्थी हे कला क्रीडा यामध्ये विशेष प्राविण्य मिळवित आहे. या लघुपटामुळे निश्चितच विद्यार्थ्यांना रंगमंच, कॅमेरा आदीसमोर जाण्याचा आत्मविश्वास मिळाला असून निश्चितच शिक्षण विभागासाठी व ठाणे महापालिकेसाठी अभिमानाची बाब असल्याचे उपायुक्त डॉ.मिताली संचेती यांनी नमूद केले. 'बालरंग' योजनेचे हे चौथे वर्ष असून या माध्यमातून महापालिकेच्या पाचवी ते नववीतील सुमारे ४०० विद्यार्थ्यांना नाट्य, अभिनय, कॅमेरा हाताळणी, संवाद कौशल्य तसेच चित्रपट निर्मितीचे प्रशिक्षण दिले जाते. यावर्षी निवडक विद्यार्थ्यांना संधी देत हा लघुपट तयार करण्यात आला असल्याचे साहिल मोशन आर्टचे मंगेश देसाई यांनी नमूद केले. बालकलाकार श्रेयस थोरात यांनीही विद्यार्थ्यांच्या अभिनयाचे कौतुक करत पालकांनी मुलांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले. यावेळी ठाणे महानगरपालिका शाळांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केजीएन फाउंडेशनच्यावतीने शिरखुर्मा किट वाटप

- **रमजान ईदनिमित्त गोरगरीब व गरजूंसाठी कौतुकास्पद सामाजिक उपक्रम**

**नारायणगाव : (समर्थ गांवकरी)**




ख्वाजा गरिब नवाज फाउंडेशनच्या माध्यमातून रमजान ईदनिमित्त 'एक हात मदतीचा' या माध्यमातून नारायणगाव आणि परिसरातील गोरगरीब व गरजू मुस्लिम बांधवांना शिरखुर्मा किट वाटप करण्यात आले. यावेळी मेहबूब काझी व एजाज आतार म्हणाले की, केजीएन फाउंडेशन विविध सामाजिक उपक्रम राबवत असून रमजान ईदनिमित्त गोरगरीब व गरजूंसाठी राबविण्यात आलेला शिरखुर्मा किट वाटप उपक्रम कौतुकास्पद आहे. अध्यक्ष जुबेर आतार यांनी फाउंडेशनच्या माध्यमातून गरजूंसाठी आरोग्य शिबिर, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, उर्दू शाळेसाठी साहित्य व रंगकाम, मराठा आंदोलन काळात आंदोलकांना बिसलरी वाटप, कोरोना काळात किराणा किट वाटप यांसह विविध सामाजिक उपक्रम सातत्याने राबवत असल्याचे सांगितले.

यानिमित्ताने नारायणगाव मुस्लिम सुन्नी जमातचे अध्यक्ष एजाज आतार, विश्वस्त अलीसाबीर इनामदार, मेहबूब काझी, सिद्दीक शेख, आदम आतार, केजीएन फाउंडेशन अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य जुबेर आतार, उपाध्यक्ष रज्जाक काझी, सचिव रियाज मनियार, सहसचिव समीर इनामदार, खजिनदार तौसिफ पठाण, कार्याध्यक्ष रिहान कुरेशी, यांसह सदस्य आमिर तांबोळी, डॉ. इम्रान शेख, दानिश इनामदार, इरफान काझी, जावेद पटेल, अशफाक पटेल, मोईन इनामदार, जाकिर मनियार, सलीम मनियार, जुबेर शेख, कायदेशीर सल्लागार ॲड.युसुफ आत्तार यांसह मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते.

या शीरखुर्मा किट वाटपासाठी सिद्दीक शेख, एजाज आतार, मेहबुब काझी, अलीसाबीर इनामदार, मोईन पठाण, शफीक खान, युनूस काझी, अशफाक पटेल यांनी योगदान दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक मेहबूब काझी यांनी केले तर आभार जुबेर आतार यांनी मानले.

# श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन



**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

दि. १९ मार्च ते शुक्रवार, दि. २७ मार्च पर्यंत करण्यात आले असुन दैनंदिन विविध धार्मिक कार्यक्रमासह हभप प्रणव पटवारी यांच्या सुमधुर वाणीतुन संगीतमय रामकथा दुपारी दोन ते सहा वाजेपर्यंत श्रीराम मंदिर सिडको येथे आयोजित करण्यात आली आहे.

श्री प्रभुरामचंद्राच्या कृपेने व सर्व रामभक्त बंधू-भगिनींच्या सहकार्याने श्री राम जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात येणार आहे.या निमित्ताने श्री रामकथा दि. १९ मार्च ते २५ मार्च दरम्यान दररोज दुपारी २.३० ते ६ पर्यंत.व्याख्याते -प्रवचनकार

प्रणव जनार्दन पटवारी माजलगांव, जि. बीड.तर तबला संजय देशपांडे संवादिनी अर्जुन गुंडाळे १९ मार्च ते २७ मार्च सकाळी ६ते ८.३० श्री रामाचा पवमान अभिषेक श्री सुशीलगुरु कुलकर्णी यांच्या हस्ते सकाळी,आरती/ नित्यपाठ १९ मार्च ते २७ दुपारी २ ते ६ श्री रामकथा (ह.भ.प.श्री प्रणव पटवारी) २३ मार्च सकाळी १० वाजता रुद्र स्वाहाकार महायज्ञ (पौराहित्य: सुशिलगुरु) दिनांक २६ मार्च सकाळी १० ते १२ श्री रामजन्म कीर्तन (श्री रामकृष्ण गोविंदराव जामकर)दुपारी १२ वा.श्री रामजन्म उत्सव (पाळणा, महाआरती) सायं.६ वा.श्री रामाची शोभायात्रा (मंदिर-शिवाजी चौक श्री राममंदिर) २७ मार्च सकाळी १०.३० ते १२ लक्ष्मीकांत रवंदे याच्या संगीत विद्यालयाचे सादरीकरण 'रामधुन' (भक्तीसंगीतावर आधारीत कार्यक्रम) दुपारी १२ ते ४ श्री रामाची आरती व महाप्रसाद (भंडारा) आयोजित करण्यात आला आहे.

श्रीराम मंदिर संस्थान'चे हे ३५ वे वर्ष असून,यावर्षी कवि, लेखक, प्रवचनकार श्री प्रणव जनार्दन पटवारी यांच्याअमृतवाणीतून 'श्री रामकथा' आपणास श्रवण करता येणार आहे

प्रणव जनार्दन पटवारी हे माजलगाव जि.बीड येथील रहिवासी असून ते कवि, लेखक व प्रबोधनकार म्हणुन सुप्रसिद्ध आहेत.

# मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांचा सुधारित दौरा

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड हे गुरुवार 19 मार्च 2026 रोजी नांदेड जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा सुधारित दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील. गुरुवार 19 मार्च 2026 रोजी घाटंजी तालुक्यातील मोवाडा हेलिपॅड येथून हेलिकॉप्टरने सकाळी 10.55 वा. धनोडा हेलिपॅड येथे आगमन व शासकीय वाहनाने माहूर तालुक्यातील धनोडा उच्च पातळी बंधारा साईटकडे प्रयाण. सकाळी 11 वा. धनोडा उच्च पातळी बंधाऱ्याच्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती. स्थळ धनोडा उच्च पातळी बंधारा साईट ता. माहूर. सकाळी 11.55 वा. धनोडा उच्च पातळी बंधारा येथून शासकीय वाहनाने धनोडा हेलिपॅडकडे प्रयाण करतील. दुपारी 12 वा . धनोडा हेलिपॅड येथे आगमन व हेलिकॉप्टरने सेवादासनगर हेलिपॅड ता. जिवती जिल्हा चंद्रपूरकडे प्रयाण करतील.

# 'ताणतणाव व्यवस्थापन' विषयावर विशेष व्याख्यान

## संशोधक, विद्यार्थी आणि प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



संशोधन प्रक्रियेत येणारे मानसिक दडपण आणि वेगवान जीवनशैलीमुळे वाढणारा ताण यावर प्रभावी उपाय सुचविण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या नवउन्मेषण व उपक्रम विभागाच्या वतीने दि.१७ मार्च रोजी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमास संशोधक, विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या व्याख्यानासाठी विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे मानसोपचार तज्ज्ञ

डॉ. उमेश उषा आत्राम हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी ताणतणावाचे शास्त्रीय विश्लेषण करत त्याचा अर्थ, स्वरूप, मेंदूतील होणारे बदल तसेच शरीरातील विविध ग्रंथींची भूमिका यावर सविस्तर प्रकाश टाकला.

ताण निर्माण होण्याची कारणे, त्याचे शारीरिक व मानसिक परिणाम आणि त्याची लक्षणे ओळखण्याचे मार्ग याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. सामाजिक उदाहरणे आणि स्वतःच्या अनुभवातील यशोगाथा सांगत त्यांनी ताण व्यवस्थापनासाठी

उपयुक्त ठरणाऱ्या विविध प्रायोगिक तंत्रांची माहिती दिली.

व्याख्यानाच्या शेवटी उपस्थितांना 'आनापान' ध्यान साधनेचा प्रत्यक्ष सराव करून घेण्यात आला. या ध्यान प्रक्रियेमुळे सहभागींत सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून दैनंदिन जीवनात या साधनेचा अवलंब करण्याची प्रेरणा मिळाली.

हा उपक्रम कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन आणि कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नवउन्मेषण व उपक्रम विभागाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर यांनी डॉ. आत्राम यांचा परिचय करून दिला.

यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी आणि डॉ. जी. कृष्णा चैतन्य यांच्या हस्ते डॉ. आत्राम यांचा ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास डॉ. स्मिता नायर, डॉ. वसंत साळुंखे, बालाजी भासीकर आणि ओमकार मठपती यांची प्रमुख उपस्थिती होती.

# शासनाची स्पर्श प्रणाली ठरतेय घरकूल अनुदानासाठी अडचण

- **अनुदाना अभावी शेकडो घरकुलाचे बांधकाम रखडले**

**तामसा : (समर्थ गांवकरी)**



शासनाच्या मागेल त्याला घरकुल अर्थात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ग्रामीण भागात मंजूर झालेल्या हजारो घरकुलाचे बांधकाम बऱ्यापैकी प्रगतीपथावर असतानाच घरकुलाचे हप्ते मिळत नसल्याचा धक्कादायक प्रकार पुढे आला असून घरकूल अनुदान वाटपात शासनाची स्पर्श प्रणाली मोठी अडचण ठरत असल्याचे सांगण्यात आल्याने अनुदाना अभावी शेकडो घरकुलाचे बांधकाम रखडल्याने घरकुल लाभार्थ्यांचा शासनप्रणाली विरोधात तीव्र असंतोष पसरला आहे.

शासनाने प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मागेल त्याला घरकुल देण्याची प्रभावी योजना अंमलात आणली. त्यामुळे गरिबांचे घराचे स्वप्न पूर्ण होत असल्याचा आनंद प्रत्येक लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर पाहायला मिळत होता. सुरुवातीला पंधरा हजाराचा पहिला हप्ता टाकून घरकूल बांधकाम सुरु करण्याच्या सूचना केल्याने पुढील हप्ता वेळेत मिळेल या भरवशावर घरकुल लाभार्थ्यांनी उसनवारी, व्याजीदिडी करून शासनाकडून मिळालेल्या घरकुलांचे बांधकाम युद्ध पातळीवर चालू केले. त्यातही हदगाव पंचायत समितीच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी टक्केवारीची मेख मारली. ज्या लाभार्थ्यांनी टक्केवारी दिली. अशा काही लाभार्थ्यांच्या बँक खात्यात 70 हजार रुपयांचा घरकुलाचा दुसरा व 30 हजाराचा तिसरा हप्ता सुद्धा टाकण्यात आल्याचे लाभार्थी सांगतात. परंतु ज्या लाभार्थ्यांनी टक्केवारी देण्यास विरोध केला त्या लाभार्थ्यांना केवळ पंधरा हजार रुपयांच्या पहिल्या हप्त्यावरच घरकुलाचे बांधकाम करण्याची सक्ती केली. तरीही पक्क्या घराचे दिव्य स्वप्न पाहणाऱ्या अनेक लाभार्थ्यांनी घरकुलाचे बांधकाम केले. मात्र त्यानंतर शासनाकडून घरकुल लाभार्थ्यांना एकही रुपया मिळाला नाही. उधारीवारीवर खरेदी केलेल्या बांधकाम साहित्याची उधारी वसुलीसाठी व्यापाऱ्यांनी लाभार्थ्यांना वेठीस धरले. त्यामुळे गरिबांचे घरकुलाचे स्वप्न उधळले गेल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. घरकुलाचे बील काढण्यासाठी लाभार्थी पंचायत समितीच्या दालनात खेटे मारत आहेत. परंतु शासनाची स्पर्श प्रणाली चालत नसल्याचे सांगून घरकुल लाभार्थ्यांना माघारी पाठवले जात आहे. एकीकडे शासन गरिबांना घरकुल दिल्याचे सांगून आपला बडेजावपणा करत आहे तर दुसरीकडे स्पर्श प्रणालीची मेख मारुन घरकुल लाभार्थ्यांच्या तोंडाला पाने पुसत असल्याने शासनाच्या घरकुल योजनेचा बोजवारा उडाल्याचे चित्र निर्माण झाले आहे. रखडलेली बांधकामे आणि घरकुल लाभार्थ्यांचे वाढते कर्ज पाहता, जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणात स्वतः लक्ष घालून 'स्पर्श' प्रणालीतील तांत्रिक दोष दूर करावा आणि भ्रष्ट कर्मचाऱ्यांवर कारवाई करून लाभार्थ्यांचे थकीत हप्ते त्वरित जमा करावेत, गोरगरिबांच्या घरकुलाचे स्वप्न पूर्ण कण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे अनेकांनी स्पष्ट केले.



# अर्चना मधुकर कांबळे यांचे निधन

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

कंधार येथील एसटी महामंडळाचे सेवानिवृत्त कर्मचारी मधुकर कांबळे यांच्या पत्नी अर्चना मधुकर कांबळे यांचे अल्पशा आजाराने 57 व्या वर्षी मंगळवारी रात्री 9 वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दिनाक 18 मार्च रोजी दुपारी कंधार येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती,सुन,दोन मुली नातवंड असा परिवार आहे. त्या मनमिळावू स्वभावाच्या होत्या तर त्यांनी परिसरातील आया बायांशी घट्ट नाती सांभाळ करणाऱ्या म्हणून परिसरात त्यांची ओळख होती.

# गाळेधारकांकडून अवाजवी भाडे आकारणी रद्द करा

## *उपमहापौर व सभापती याना व्यापारी आघाडीचे निवेदन*

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



भारतीय जनता पार्टी शहर जिल्हाध्यक्ष - व्यापारी आघाडी महेश गुगळे यांच्या सह आज व्यापाऱ्यांनी उपमहापौर धनंजय जाधव व स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे यांना अहिल्यानगर महानगरपालिकाने जुने दाणे डबरा व गंजबाजार, गाळे भाडे वाढ रद्द करा या मागणीचे निवेदन दिले.

यावेळी नगरसेवक निखिल वारे,महेश लोंढे ,गोरख पडोळे,संजय ढोणे, भाजपा उपाध्यक्ष गोपाल वर्मा उपस्थित होते तर व्यापारी आघाडी पदाधिकारी अध्यक्ष महेश गुगळे,हर्षल बोरा,नीरज राठोड,रुपेश वर्मा,सुरेश लालबागे,लक्ष्मीकांत तिवारी, संजय कांगडा, प्रशांत डहाळे, महेंद्र नांदुरकर,देवेंद्र दुधाळे हेमंत पवार,प्रशांत बुऱ्हाडे,जुना दाणे डबरा व्यापारी संघटनाचे अरुण पारेख,प्रकाश बोरा, विजय बोंद्रे ,राजेंद्र गांधी,संतोष भटेवरा,किरण राका,भाऊसाहेब पांढरे,धीरज पोखरणा,विजय गांधी,प्रवीण सुराणा,वेणुगोपाल झंवर आदी उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे कि अ.नगर महानगरपालिकेच्या गाळेधारकांकडून घटनाबाह्य अवाजवी भाडे आकारणी झालेली असून सदर आकारणी रद्द करण्यात यावी तसेच गाळेधारकांचे मालक महानगरपालिका असताना गाळे धारकांकडून घरपट्टी व इतर कर घेवू नये,दि. ६ नोव्हेंबर २०२३ चे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, असाधारण क्र. ४१८ नुसार नवीन भाडे आकारणी करण्यात यावी,सन २०१६-१७ साली जे मुळ भाडे आकारणी होती व त्यानंतर करण्यात आलेले भाडे वाढ ह्यात फार मोठी तफावत आहे व ती दुरुस्त करण्यात यावी. दि. २०/०७/२०१८ रोजी झालेल्या महासभेत प्रस्ताव क्र. ३ प्रस्तावाचा विषय गाळे धारकांचे भाडे वाढ रद्द करणेबाबत सविस्तर चर्चा होऊन सदरचा निर्णय झाला.



स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांच्या 432 व्या जयंतीनिमित्ताने वेरूळ येथील मालोजीराजे भोसले गडी व शहाजीराजे भोसले स्मारक येथे स्वराज्य संकल्पक शहाजीराजे यांना अभिवादन करण्यात आले. त्याचप्रमाणे छत्रपती संभाजी महाराज यांच्या 337 व्या तिथीप्रमाणे पुण्यतिथी निमित्ताने अभिवादन करण्यात आले. यावेळी छावा भारत क्रांती मिशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ विलासभाऊ पांगारकर, माजी कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य रमेश आप्पा पांगारकर, संपत पगार, पत्रकार अमोल सोनवणे, अतुल पांगरकर, विष्णू पांगरकर आदी उपस्थित होते.

# मिरजगाव येथे यतिमखानातील मुलांना इफ्तार पार्टी

## राजेजाधव परिवाराचा रमजाननिमित्त स्तुत्य उपक्रम

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**



मुस्लिम बांधवांच्या पवित्र रमजान महिन्याचे औचित्यसाधून व रमजान ईदच्या पूर्वसंध्येला कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथील युवा उद्योजक अतुल राजेजाधव व परिवाराच्या वतीने मंगळवारी, दि.१७ मार्च रोजी यतिमखाना याठिकाणी अनाथ मुलांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. राजेजाधव परिवार यांच्या वतीने सामाजिक सलोखा जपत समाजात बंधुभाव आणि ऐक्य वाढावे, या उद्देशाने येथील यतिमखानामध्ये साईसृष्टी उद्योग समूहाचे सर्वेसर्वा व उद्योजक अतुल राजेजाधव, सुभाषशेठ राजेजाधव, अक्षय राजेजाधव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उपस्थित राहून मुलांना फल उपहार दिला.

यावेळी मौलाना फारुक सय्यद यांच्यासह मुस्लिम बांधव व यतिमखानामधील मुले मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानिमित्ताने राजेजाधव यांनी गेली अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबविण्याची परंपरा आजही कायम राखली आहे.

हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश देत आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात एकोप्याचे अद्वितीय दृश्य पाहायला मिळाले.

यावेळी सर्व मुस्लिम समाज बांधवांना ईदच्या शुभेच्छा देत समाजातील बंधुभाव, एकता आणि सौहार्दाचा एकप्रकारे संदेश दिला गेला आहे. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर शहरासह ग्रामीण भागात सामाजिक संघटना, संस्था, प्रतिष्ठानच्या वतीने रोजा इफ्तार पार्टी देऊन बंधुभाव, सामाजिक ऐकता, सलोखा जोपासला जात आहे. सामाजिक सलोखा कायम ठेवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा, हीच काळाची गरज आहे. यतिमखानातील अनाथ मुलांना दिलेल्या रोजा इफ्तार पार्टीतून यानिमित्ताने बंधुभाव व एकात्मतेचा संदेश देण्यात आला.

यतिमखानातील अनाथ मुलांसोबत इफ्तार पार्टीचे आयोजन करणे हा एक अत्यंत स्तुत्य, सामाजिक आणि पुण्यदायी उपक्रम आहे. यामुळे लहान मुलांना रमजानच्या पवित्र महिन्यात आनंद आणि आपुलकीची भावना मिळते. राजेजाधव यांनी या इफ्तार पार्टीच्या माध्यमातून समाजाला अनोखा संदेश दिला आहे.



# जनतेच्या आवाजाला प्रतिसाद देणंच लोकप्रतिनिधीच काम

## आमदार काशिनाथ दाते सर : बेल्हा-शिरूर रस्त्याचे काम पुन्हा सुरु"

पारनेर : (समर्थ गांवकरी)

बेल्हा-शिरूर या महत्त्वाच्या मार्गाचे काम जवळपास पूर्णत्वास आले असताना काही ठिकाणी आंदोलनामुळे ते अचानक ठप्प झाले होते. विशेषतः निघोज एस.टी. बसस्थानक परिसरात काम बंद पडल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. खराब रस्त्यामुळे गेल्या दोन महिन्यांत शंभरहून अधिक दुचाकी अपघात घडल्याने अनेक कुटुंबांना आर्थिक व मानसिक फटका बसला होता. नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती.

या पार्श्वभूमीवर "आपली माती आपली माणसं" या सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रुपेश ढवण यांनी आमदार काशिनाथ दाते सर यांची भेट घेऊन प्रत्यक्ष परिस्थितीची माहिती दिली.



तसेच पारनेर तालुका पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनीही संपर्क कार्यालयात झालेल्या बैठकीत रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी केली.

जनतेच्या या भावना लक्षात घेऊन आमदार दाते सरांनी तात्काळ जिल्हाधिकारी व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधत दि. ३१ मार्चपूर्वी काम पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. त्यांच्या या ठोस हस्तक्षेपानंतर बुधवार दि. १८ मार्चपासून रस्त्याचे काम पुन्हा सुरू झाले आहे.

आमदार दाते यांच्या तत्पर निर्णयक्षमतेमुळे आणि जनतेप्रती असलेल्या बांधिलकीमुळे हे काम मार्गी लागल्याने निघोज परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. "बोलण्यापेक्षा कृतीतून उत्तर देणारे नेतृत्व" अशीच प्रतिक्रिया सर्वसामान्यांतून उमटत असून मतदारसंघात सुरू असलेल्या विकासकामांबाबत नागरिकांमध्ये सकारात्मक भावना निर्माण झाली आहे. या कामाच्या पुर्नप्रारंभाबद्दल पारनेर तालुका पत्रकार संघ, रुपेश ढवण (आपली माती आपली माणसं), निघोज ग्रामस्थ, मुंबईकर मंडळ व कुलाबा मंडळ यांच्या वतीने आमदार काशिनाथ दाते यांचे आभार मानण्यात आले.

"निघोज परिसरातील रस्त्याच्या बिकट अवस्थेमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. ही परिस्थिती आम्ही आमदार काशिनाथ दाते सरांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी तात्काळ दखल घेत काम पुन्हा सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला. त्यांच्या या तत्पर निर्णयामुळे जनतेला मोठा दिलासा मिळाला आहे. विकासकामांप्रती असलेली त्यांची बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे."

**- रुपेश ढवण (आपली माती आपली माणसं)**

"निघोज परिसरातील रस्त्याचे काम बंद पडल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे आमदार दाते सरांच्या निदर्शनास आणून देताच त्यांनी तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधून काम सुरू करण्याचे आदेश दिले, ही त्यांच्या कार्यतत्परतेची जाणीव करून देणारी बाब आहे. त्यांच्या हस्तक्षेपामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून विकासकामांबाबत त्यांची बांधिलकी स्पष्ट झाली आहे. पत्रकार म्हणून जनतेचा आवाज योग्य पदाधिकाऱ्यापर्यंत पोहोचवण्याची भूमिका यशस्वी ठरल्याचे समाधान आहे."

**- दत्ताजी उनवणे, जेष्ठ पत्रकार**

## माणिकदौंडी परिसराला जायकवाडी नळ पाणीपुरवठा योजना मंजूर करा : मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे

### पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे मागणी

पाथर्डी : (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील माणिकदौंडी हा दुष्काळी व दुर्गम भाग असून या भागातील गावे ही नेहमीच दुष्काळाच्या झळा सहन करत असून पटेलवाडा तलाव सोडता कुठेही बारा महीने पुरेल एवढा शाश्वत पाण्याचा स्त्रोत नसल्याने माणिकदौंडी परिसरातील गावांना जायकवाडी धरणातून नळ पाणीपुरवठा योजना मंजूर करावी अशी मागणी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्याकडे मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी केली. माणिकदौंडी परिसर हा डोंगराळ व दुर्गम असल्याने या भागातील जनतेला पाण्यासाठी नेहमीच वणवण व पायपीट करावी लागते ही वस्तुस्थिती आहे यासाठीच आपण ही मागणी केली असून पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव



पाटील यांनी याविषयी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित अधिकाऱ्यांना याविषयी सूचना केल्या असून या पाणीपुरवठा योजनेचा आपण सतत पाठपुरावा करणार असल्याचे अविनाश पालवे यांनी सांगितले.

## कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या ७ गाईंची सुटका; रावेर पोलिसांची धाडसी कारवाई!



रावेर: (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्र–मध्यप्रदेश सीमेवरील शेडीया अंजन गावाकडून पाल गावाकडे सुकी नदीच्या पात्रातून चोरट्या मार्गाने कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या ७ गाईंची रावेर पोलिसांनी सुटका केली आहे. या प्रकरणी आरोपी जहांगिर हसन तडवी (वय ३६, रा. बोरव्हाल, ता. झिरण्या, जि. खरगोन, म.प्र.) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी गाईंची कोणतीही चारा-पाण्याची व्यवस्था न करता त्यांना काठीने मारहाण करत अत्यंत क्रूरपणे नेत होता. याबाबत माहिती मिळताच पोलीस निरीक्षक डॉ. विशाल जयस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार जगदीश पाटील व पोलीस नाईक कल्पेश आमोदकर यांनी तात्काळ कारवाई केली. पाल गावातील कृषी विज्ञान केंद्रासमोरील स्मशानभूमीजवळ सुकी नदीच्या पात्रात सापळा रचून पोलिसांनी ७ गाई (अंदाजे किंमत ५६ हजार रुपये) ताब्यात घेत त्यांची सुटका केली. त्यानंतर सर्व गाई गोशाळेत दाखल करण्यात आल्या.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस नाईक कल्पेश आमोदकर हे करत असून, ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते व उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## बालाजी मंदिर येथे अभिषेकाचे आयोजन

नवीन नांदेड: (समर्थ गांवकरी)

गुढीपाडवा व हिंदुनवर्वषाचा निमित्ताने 19 मार्च रोजी हडको येथील श्री बालाजी मंदिर देवस्थान येथे सकाळी सहा वाजता अभिषेक करण्यात येणार आहे. सर्व भाविक भक्तांना कळविण्यात अत्यंत आनंद होत आहे की, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नवसाला पावणारा श्री बालाजी देवतेचा गुढीपाडवा व हिंदू नववर्षाच्या स्वप्नपूर्ती साठी दिनांक 19 मार्च 2026 रोज गुरुवारी सकाळी साडेसहा वाजता अभिषेक करण्यात येणार आहे , दिवसभर प्रसाद वाटपाचे नियोजन करण्यात आलेले असुन भक्तांना विनंती की अभिषेक नोंदणी मॅनेजर स्वामी मो.नंबर 88 066 35 125 यांच्या कडे करावी असे आवाहन विश्वस्त मंडळ श्री बालाजी मंदिर देवस्थान आनंद सागर सोसायटी हडको नवीन नांदेड अधिक माहितीसाठी संपर्क 88059 211 26 व 97 30 13 45 44 साधावा.

## ढवळपुरी अत्याचार प्रकरणी आ. दातेंचा विधानसभेत संतप्त आवाज

- आरोपीस कठोर शिक्षा व जलदगती न्यायालयात खटला चालवा!

पारनेर : (समर्थ गांवकरी)

पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथे घडलेल्या अल्पवयीन मुलीवरील अमानुष अत्याचार प्रकरणी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सरांनी विधानसभेच्या अधिवेशनात औचित्याचा मुद्दा उपस्थित करत ठाम व आक्रमक भूमिका मांडली. अधिवेशनात बोलताना आमदार दाते सर यांनी संबंधित घटनेचा घटनाक्रम सभागृहासमोर मांडताना सांगितले की, ढवळपुरी गावातील दुर्गादेवी वारकरी शिक्षण संस्थेचा अध्यक्ष असलेला कीर्तनकार यशवंत एकनाथ थोरात उर्फ अण्णासाहेब गुंजाळ याने एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याची घटना १० मार्च २०२६ रोजी उघड झाली असून सबंधित मुलगी



श्री. काशिनाथ महादु दाते

आठवीत शिकत असून आरोपीने पिडीत मुलीच्या कुटुंबाला ठार मारण्याची धमकी देत गेल्या तिन वर्षांपासून तिच्यावर सातत्याने अत्याचार करत आलेला आहे. यापूर्वी मी दोन हाफमर्डर केले असल्याचे सांगत तु कुणालाही सांगितले तरी तुझ्या आईवडिलांना व भावाला मारून टाकीन अशी भीती दाखवत सबंधित आरोपीने ढवळपुरी व परिसरातील काही महिला व युवतींना प्रेमाच्या जाळ्यात अडकवून व पैशाचे आमिष दाखवून त्यांच्यावर अत्याचार केल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच या तथाकथित महाराजाने चार विवाह केलेले असून घटना घडली त्या दिवशी सबंधित आरोपीने या अल्पवयीन मुलीला घरी बोलावून तिला बांबू व इतर साधनाने मारहाण केली. एवढ्यावरच तो थांबला नाही तर स्वयंपाक करण्याची पक्कड गरम करून त्याचे चटके तिला दिले आहे ज्यामुळे त्या मुलीला चालणेही अवघड झाले आहे. दरम्यानच्या काळात पीडितेला मानसिक व शारीरिक छळ सहन करावा लागला. आरोपीने तिला धमकावून गेली तिन वर्ष हा प्रकार लपवून ठेवला, मात्र अखेर धैर्य एकवटून पीडितेने घडलेला प्रकार उघड केल्यानंतर हा धक्कादायक प्रकार समोर आला. या घटनेनंतर ढवळपुरी गावासह संपूर्ण जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. "अशा विकृत प्रवृत्तीला कोणतीही माफी नाही. संबंधित आरोपीवर कठोरात कठोर कारवाई होऊन त्याला कडक शिक्षा झाली पाहिजे आणि पीडितेला तातडीने न्याय मिळावा यासाठी हा खटला जलदगती न्यायालयात चालवण्यात यावा, अशी ठोस मागणीही त्यांनी केली. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर असून अशा घटनांवर कडक कायदेशीर कारवाई करणे गरजेचे असल्याचे ठाम मत आमदार दाते यांनी यावेळी व्यक्त केले.

मागील आठवड्यात कान्हूर पठार येथिल दोन अल्पवयीन बहिणींवर अत्याचार झाल्याची घटना घडलेली असतानाच पुन्हा ही घटना घडलेली आहे. पारनेर तालुक्यात सध्या महिलावरील अत्याचाराच्या घटनांत वाढ झाली असून अशा प्रकारच्या गुन्ह्यांतील आरोपींच्या विरोधात जलदगती न्यायालयात खटले चालवून आरोपींना कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे.

**- आमदार काशिनाथ दाते सर**

## AI आणि इंडस्ट्री ५.० विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद

ठाणे: (समर्थ गांवकरी)

साकेत ज्ञानपीठाच्या प्रमोद राम उजागर तिवारी साकेत इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, कल्याण येथे "इंडस्ट्री 5.0 मधील AI चे प्रशासन: नैतिक, संस्थात्मक आणि शाश्वततेचे दृष्टिकोन" या विषयावर तिसरी आंतरराष्ट्रीय बहुविषयक संशोधन परिषद यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आली. या परिषदेत २५ हून अधिक संस्थांचे प्रतिनिधित्व करणारे ३०० पेक्षा जास्त संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रसंगी एकूण १८० संशोधन निबंध प्राप्त झाले. मलेशिया, आयर्लंड, नायजेरिया, लाइबेरिया, तुर्की आणि UAE या सहा देशांतील संशोधकांनीही या जागतिक शैक्षणिक देवाणघेवाणीत सहभाग घेतला. काश्मीर विद्यापीठ, KIIT विद्यापीठ (भुवनेश्वर), कर्णावती विद्यापीठ, गोपाल नारायण सिंह विद्यापीठ (बिहार) आणि



गव्हर्नमेंट कॉलेज हुस्नाबाद (तेलंगणा) यांसारख्या संस्थांचे संशोधक सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक दीपप्रज्वलनाने झाली.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बिझनेस डेव्हलपमेंट विभागाच्या प्रमुख व संचालक श्रीमती शशी बाला यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून मानवी-केंद्रित कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी तंत्रज्ञानातील नवकल्पना आणि नैतिक जबाबदारी यामधील संतुलन राखण्यावर भर दिला. मान्यवर पाहुणे म्हणून डॉ. सतीश रेवतकर (उपप्रमुख, बिझनेस डेव्हलपमेंट व सिटी मार्केटिंग, बृहन्मुंबई महानगरपालिका) आणि श्रीमती गीता ओझा (संस्थापक, क्लासिक फ्लोरा) यांनी संस्थात्मक कार्यपद्धतींमध्ये AI ची वाढती भूमिका याबद्दल आपले विचार मांडले.

या परिषदेला साकेत ज्ञानपीठाचे माननीय सचिव श्री साकेत तिवारी यांचीही उपस्थिती लाभली. तसेच नर्सिंग, शिक्षण, कला, विज्ञान आणि वाणिज्य या साकेत समूहातील विविध संस्थांचे प्रमुखही उपस्थित होते, ज्यामुळे या कार्यक्रमाचा बहुविषयक स्वरूप अधोरेखित झाला.

संशोधन सादरीकरणासाठी आयोजित तांत्रिक सत्रांचे मूल्यांकन डॉ. संपूर्णा मेहता आणि डॉ. ओम दिवाणी यांनी केले, तर ऑनलाइन सादरीकरणांसाठी डॉ. केतन रबाडिया यांनी तांत्रिक तज्ज्ञ म्हणून काम पाहिले.



## प्रा. उदय नाईक यांची उपप्राचार्यपदी नियुक्ती

ठाणे : (समर्थ गांवकरी)

के.व्ही.पेंढारकर महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा. उदय कमलाकर नाईक यांची उपप्राचार्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. प्रा. नाईक हे सॉफ्टबॉल, आर्चरी, आट्यापाट्या आणि टेनिस बॉल क्रिकेट अशा विविध क्रीडा प्रकारांमध्ये सक्रिय असून ठाणे जिल्ह्यातील अनेक क्रीडा संघटनांशी ते जोडलेले आहेत.

## अतिवृष्टीग्रस्त गावांतील विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफीसाठी दाखले देणेबाबत तहसीलदारांना निवेदन

- भाजपचे मंडलाध्यक्ष गोकुळ दिघे यांची मागणी

संगमनेर तालुका: (समर्थ गांवकरी)

तालुक्यात यंदा झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक गावांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून प्रशासनाने जोर्वे, कोल्हेवाडी, वाघापूर, रायते, रहिमपूर, मनोली, ओझर (खुर्द), उंबरी, बाळापूर, पानोडी, हंगेवाडी, ओझर (बुद्रुक), कनकापुर, कनोली, पिंपरणे, डिग्रस, मालुंजे, अंभोरे आणि कोळवाडे ही गावे अधिकृतपणे अतिवृष्टीग्रस्त म्हणून घोषित केली आहेत.

दरम्यान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिपत्रक क्र. परीक्षा/छावता/३१८ दि. ५ मार्च २०२६ नुसार, शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ मधील नोव्हेंबर २०२५ सत्राच्या परीक्षा फीमध्ये राज्यातील अतिवृष्टी व पूरग्रस्त गावांतील विद्यार्थ्यांना फी



माफी जाहीर करण्यात आली आहे. या निर्णयामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

मात्र, या सवलतीचा लाभ घेण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांना आपल्या गावाचा 'अतिवृष्टीग्रस्त' असल्याचा अधिकृत दाखला महाविद्यालयात सादर करणे अनिवार्य आहे. अनेक विद्यार्थ्यांकडे सध्या हा दाखला उपलब्ध नसल्यामुळे त्यांना फी माफीपासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. तालुक्यातील काही ठिकाणी तलाठी हे दाखले देण्यास टाळाटाळ करत असल्याची बाब निदर्शनास आल्याने या पार्श्वभूमीवर तहसीलदारांना निवेदन देण्यात आले असून, संबंधित गावांतील तलाठी यांना तात्काळ आदेश देऊन विद्यार्थ्यांना आवश्यक दाखले उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, प्रक्रिया सुलभ व जलद करण्यात यावी, जेणेकरून एकही पात्र विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहणार नाही, यावरही भर देण्यात यावा. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा भाजपाचे मंडलाध्यक्ष गोकुळ दिघे यांनी व्यक्त केली आहे.

## कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या उपाध्यक्ष पदी उत्तम खंदारे यांची निवड



अर्धापूर : (समर्थ गांवकरी)

कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, समाजकल्याण, महिला बालविकास,दिव्यांग कल्याण आयुक्तालय, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष पदी उत्तम खंदारे यांची निवड करण्यात आली आहे.

कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, समाज कल्याण आयुक्तालय अध्यक्ष श्रीमती शालिनी भुषण दगडे यांनी कास्ट्राईब कर्मचारी महासंघ,समाजकल्याण, महिला बालविकास, दिव्यांग कल्याण आयुक्तालय आयुक्तालय,इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयांच्या उपाध्यक्ष पदी उत्तम खंदारे यांच्या कार्याची दखल घेऊन निवड करण्यात आल्याचे नियुक्त पत्र दिले आहे.

उपाध्यक्षपदी उत्तम खंदारे यांची निवड झाल्याबद्दल अनेकांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# असुर्डे खापरेवाडी ग्रामस्थांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये भव्य प्रवेश

## आमदार शेखर निकम यांच्या कार्यपद्धतीवर ठाम विश्वास, शिवसेना (उबाठा)ला धक्का

चिपळूण : (समर्थ गांवकरी)

चिपळूण तालुक्यातील कोकरे जिल्हा परिषद गटातील असुर्डे खापरेवाडी येथील ग्रामस्थांनी आमदार शेखर निकम यांच्या विकासाभिमुख कार्यपद्धतीवर विश्वास ठेवत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे स्थानिक राजकारणात चांगली चर्चा रंगली असून शिवसेना (उबाठा) पक्षाला मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.




यावेळी सोमा खापरे, काशिनाथ खापरे, संतोष खापरे, अजित खापरे, सुमित खापरे, राजेंद्र खापरे, प्रमोद खापरे, प्राजक्ता खापरे, अंकित खापरे, वंदना खापरे, शशिकांत खापरे, सुगंधा खापरे, योगेश खापरे, आरती खापरे, स्वाती खापरे, आयुष आग्रे, आर्यन खापरे, दिनेश खेराडे, सुजाता खेराडे, नरेंद्र खापरे, मानसी खापरे, राजेश आग्रे, कृष्णा आग्रे, अरुण आग्रे, अर्चना आग्रे, सायली आग्रे, मंगेश खापरे, गणपत खापरे, मिनाक्षी खापरे, अंजली खापरे, मारुती खापरे, प्रणय खापरे, बापूजी खापरे, प्रणय खापरे, सुजाता खापरे, महेंद्र खापरे, बापूजी खापरे, सुस्मिता खापरे, पांडूरंग खापरे, प्रतिभा खापरे, महेश खापरे, शांताराम शिगवण, विशाल शिगवण, दत्ताराम खापरे, कृष्णा खापरे, सुरज खापरे, सावी खापरे, रेश्मा खापरे, शर्मिला भुवड, धोंडू भुवड, संदेश खापरे, पारस खापरे, गणेश खापरे, सृष्टी खापरे, नारायण खापरे, ओम खापरे, सार्थक खापरे, निखील खापरे, ओम भुवड यांनी उत्स्फूर्तपणे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. आमदार शेखर निकम यांनी सर्व नवप्रवेशितांचे संपर्क कार्यालयात मनापासून स्वागत करत त्यांच्याशी सविस्तर संवाद साधला. ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेत त्या सोडवण्यासाठी व विकासात्मक कामांना गती देण्यासाठी सदैव कटिबद्ध राहण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच याचा पक्ष वाढीसाठी व पक्ष संघटना वाढीसाठी नक्कीच फायदा होईल असे नमूद केले.

ननिर्वाचित सावर्डे जि. प. गट सदस्या पुजा निकम यांनीही असुर्डे खापरेवाडी प्रवेशकर्ते ग्रामस्थांचे पक्षात स्वागत केले व त्यांना पक्ष वाढविण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी नवनिर्वाचित कोकरे जि.प. गट सदस्य संजय कदम यांनीही असुर्डे खापरेवाडी ग्रामस्थांचे पक्षात स्वागत केले व आपण पक्ष वाढीसाठी एकत्र काम करत राहू तसेच भविष्यात ग्रामस्थांच्या विकासात्मक कामांबाबत ठामपणे पाठीशी उभा राहण्याचा शब्द त्यांनी दिला.

कार्यक्रमास नवनिर्वाचित सावर्डे जि.प. सदस्या पुजा निकम, कोकरे जि.प. गट सदस्य संजय कदम, राष्ट्रवादी तालुका उपाध्यक्ष दत्ताराम गुजर, आरडीसीसी संचालक राजेंद्र सुर्वे, सरपंच पंकज साळवी, सुधीर राजेशिर्के, निलेश खापरे यांच्यासह कोकरे जिल्हा परिषद गटातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा प्रवेश केवळ राजकीय बदल नसून विकासाच्या दिशेने उचललेले ठोस पाऊल असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. आमदार शेखर निकम यांच्या नेतृत्वाखाली परिसराच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी सर्वांनी व्यक्त केला.

# एम. आर्च. करू इच्छिणाऱ्यांसाठी सेप्ट विद्यापीठात नवीन संधी

## आर्किटेक्ट्ससाठी करिअरचे मार्ग प्रशस्त करणारे नवीन विशेष अभ्यासक्रम

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

नवीन शहरांची रचना करताना पर्यावरणीय आव्हानांचा सामना करण्यासाठी सेप्ट विद्यापीठातील आर्किटेक्चर शाखेत दोन विशेष पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध झाले आहेत. मास्टर्स इन कन्झर्वेशन अँड रीजनरेशन (एमसीआर) आणि मास्टर्स इन लँडस्केप आर्किटेक्चर (एमएलए) अशी या अभ्यासक्रमांची नावे असून त्यामुळे आर्किकेक्ट्ससाठी संधी वाढणार आहेत. या अभ्याभ्यासक्रमांसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ मार्च २०२६ आहे.

CEPT UNIVERSITY

विद्यापीठाने दिलेल्या माहितीनुसार, मास्टर्स इन कन्झर्वेशन अँड रीजनरेशन या अभ्यासक्रमात संवर्धन या विषयाला प्रामुख्याने एक मूलगामी डिझाईनची पर्यावरणीय कृती मानण्यात आले आहे. त्यामुळे आजूबाजूच्या विकासविषयक दबावांना एकीकृत करू शकतील अशा ऐतिहासिक संरचनांचे सर्जनशील आणि जबाबदार पुनर्मांडणी करता येईल. इतिहास, तंत्रज्ञान, स्थापत्य आणि शहरी डिझाईन यांच्या संयोगामध्ये ज्यांना रस आहे, अशा विद्यार्थ्यांसाठी या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे.

मास्टर्स इन लँडस्केप आर्किटेक्चर (एमएलए) हा अभ्यासक्रम हवामान बदल आणि पर्यावरणीय परिवर्तनाला प्रतिसाद देणारा आहे.लँडस्केप आर्किटेक्चरमधील एम.आर्च हा अभ्यासक्रम व्यावसायिकांना लँडस्केप, पर्यावरणशास्त्र आणि समाज यांच्या संयोगावर काम करण्यासाठी तयार करणारा आहे. हा अभ्यासक्रम बागकामाच्या पलीकडे जाऊन भारतातील वाढत्या पर्यावरणीय, सामाजिक आणि शहरी आव्हानांना संबोधित करतो. तो लँडस्केपकडे एक गतिमान प्रणाली या दृष्टीने पाहून प्रादेशिक पाणलोट क्षेत्रांपासून ते शहरी सार्वजनिक जागांपर्यंत सर्व पातळींवर डिझाईन करण्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देतो. यातील पदवीधर व्यवसाय, शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात काम करणाऱ्या ५०० पेक्षा अधिक व्यावसायिकांच्या माजी विद्यार्थ्यांच्या जागतिक नेटवर्कमध्ये सहभागी होतील.

या अभ्यासक्रमांमध्ये वास्तुकला शिक्षणाचे विकसित स्वरूप आणि भारताच्या बांधणी व नैसर्गिक वातावरणाला आकार देण्यासाठी आंतरविद्याशाखीय तज्ञांची वाढती गरज याचे एकत्रितपणे प्रतिबिंब पडले आहे.

सेप्ट विद्यापीठात मध्ये पदव्युत्तर शिक्षण हा केवळ पदवीपूर्व कार्यक्रमाचा विस्तार नसतो. ते जाणीवपूर्वक विशेषीकरणाचे एक स्थान असते. इथे स्टुडिओ हे प्रयोगशाळा म्हणून, वास्तविक जगातील आव्हानांच्या सर्जनशील अन्वेषणासाठी एक जागा म्हणून काम करतात. इथे लहान गट तज्ज्ञ शिक्षकांसोबत युक्तिवाद विकसित करण्यासाठी, प्रोटोटाइपची चाचणी घेण्यासाठी आणि सातत्याने समीक्षा करून भूमिका अधिक सुधारण्यासाठी काम करतात. सेमिस्टर आणि उन्हाळी व हिवाळी स्कूलमध्ये पसरलेले हे अभ्यासक्रम व्यापक बांधणी वातावरणाच्या क्षेत्रातील विस्तृत शोधाची श्रेणी उघडते. विद्यार्थ्यांना कार्यशाळा, सॉफ्टवेअर, ग्रंथालय, अभिलेखागार, साहित्य प्रयोगशाळा आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यावसायिकांचे विस्तृत नेटवर्क या स्वरूपातील विस्तृत संसाधने उपलब्ध होतात.

# डॉ.मनिलाल शिंपी यांना महाराष्ट्र टॉप १० न्यूज तर्फे "समाजभूषण" पुरस्कार जाहीर

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

आजचा महाराष्ट्र टॉप 10 न्यूज चॅनेल चा वर्धापन दिनाच्या निमित्ताने, मानवसेवा, समाजसेवा आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय समाजकार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील समाजसेवकांचा विशेष पुरस्कार सोहळा दिनाक २२ मार्च रोजी रायगड जिल्ह्यातील रोहा येथे आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा ग्रुपचे प्रमुख, व रस्ता सुरक्षा अभियान चे विभागीय समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) आदिवासी भागातील सातपुड्यातील नंदुरबार जिल्ह्यातील शहादा परिसरातील परिवर्धा येथील श्री. रतिलाल रामदास शिंपी व लीलाबाई रतिलाल शिंपी यांचे सुपुत्र, डॉ.मनिलाल रतिलाल शिंपीहल्ली मुक्काम आंबिवली, कल्याण) यांचाकडून सुरू असलेल्या समाजसेवेचा व मानवसेवेचा कार्याची दखल घेऊन आजचा महाराष्ट्र टॉप 10 न्यूज चॅनेल चे संपादक प्रशांत/प्रसाद




गणपत मोरे यांनी घेतली असून दिनाक २२मार्च रोजी रायगड जिल्ह्यातील रोहा येथे चॅनलच्या वर्धापन दिनाचा निमित्ताने आयोजित कार्यक्रमात डॉ. मणिलाल रतिलाल शिंपी यांना "महाराष्ट्र समाज भूषण" पुरस्कार देण्यात येणार असल्याचे प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे. डॉ. मनिलाल शिंपी यांच्या कार्याचा गौरव आमच्यासाठी खूप अभिमानाची आणि आनंदाची बातमी आहे,त्यांचा संकल्पनेनुसार आम्ही खऱ्या अर्थाने समाजसेवा करीत आहोत अशी माहिती दैनिक स्वराज्य तोरण चे संपादक डॉ किशोर बळीराम पाटील व चंद्रानंद कृषी पणन संस्थेचे अध्यक्ष डॉ. यशवंत अनंत म्हात्रे, समाजसेवक उद्योजक डॉ. रामचंद्र देसले, भाजपा व्यापारी असोसिएशनचे ठाणे जिल्हा अध्यक्ष डॉ.यशवंत( भाऊ) सोरे, समाज सेवक उद्योजक डॉ.किशोर अढळकर,यांनी विशेष माहिती दिली.राजस्थान नामदेव समाजाचे सचिव नटवर वर्मा, कल्याण शिंपी आमचे सचिव,अरविंद शिंपी, प्रविण भांडारकर, गणेश साळवे, किशोर बागुल, मनोहर सोनवणे,पोलिस पाटील सोमनाथ ठाकरे, स्वामीनारायण हॉल चे संचालक डॉ दिनेश ठक्कर, रोटी डे ग्रुप चे नितील चंदेया,निलेश शहा, महिला फाऊंडेशनचा रश्मी शर्मा, लेडीज एक्सप्रेस चा मधुबेन ठक्कर,इच्छामणी भजनी मंडळाच्या अध्यक्षा, खजिनदार सचिव, परिवर्धा येथील आरोग्य सेवक, प्रसिद्ध डॉक्टर किशोर आमोदकर यांच्यासह सर्व मित्र मंडळी कडून कौतुक आणि अभिनंदन करण्यात येत आहे.



# जनता हॉस्पिटलमध्ये 'एनसीओ' कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पर्वती येथील जनता वसाहतमध्ये असणाऱ्या जनता दवाखान्यामध्ये 'एनसीओ' कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. ज्या तपासण्या सर्वसामान्यांना करणे परवडत नाही अशा तपासण्या 'एनसीओ' कॅम्पअंतर्गत करण्यात आल्या. यात प्रामुख्याने थुंकी तपसणी, ब्लड प्रेशर, शुगर, थायरॉईड तसेच कॅन्सरच्या ओरल टेस्ट यांचा समावेश आहे. या तपासण्या सर्वांसाठी मोफत असल्या तरी यामध्ये महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यात गरोदर महिलांच्याही अत्यावश्यक तपासण्या करण्यात आल्या. अशा प्रकारचे शिबिरे कायम भरवले जातात त्यामुळे सर्वसामान्यांचे आरोग्य जपले जाते. रिपोर्टमध्ये त्रुटी जाणवल्यास औषध गोळ्यांनी बरे केले जाते असे वैद्यकीय अधिकारी तहुरा शेख यांनी सांगितले.

हे शिबिर डॉ. तहुरा शेख, वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले होते. हे शिबिर यशस्वीरित्या पार पडावे यासाठी सुप्रिया ओव्हळ, छाया तोटरे, छाया कुंभार, निखिल गायकवाड, रोहित अभंग, सचिन साळुंके याचप्रमाणे सर्व 'आशा' ताई यांचे सहकार्य लाभले.




# २२ मार्च रोजी पुण्यात संमेलन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पद्मपाणी फाउंडेशन आयोजित तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली व बौद्ध अध्ययन विभागाच्या सहकार्याने अखिल भारतीय पाली साहित्य संमेलन रविवारी, २२ मार्च २०२६ रोजी पुण्यातील सावित्रीबाई फुले सांस्कृतिक भवन, भवानी पेठ (टिंबर मार्केट) येथे आयोजित करण्यात आले आहे. सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत हे संमेलन पार पडणार आहे.

# 'स्पोर्ट फॉर प्रोटेक्शन' उपक्रमांतर्गत टुर्नामेंट यशस्वी

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

सितेवाडी येथे चाईल्डफंड इंडिया,मढ संस्थेकडून राबविण्यात येणाऱ्या बालसंरक्षण प्रकल्पा अंतर्गत "स्पोर्ट फॉर प्रोटेक्शन" या उपक्रमाचा टुर्नामेंट कार्यक्रम अत्यंत उत्साहात यशस्वीरित्या पार पडला.या कार्यक्रमात ९ ते १३ वयोगटातील एकूण २०९ मुले-मुली सहभागी झाली होती. यासोबतच पालक,शिक्षक, सरपंच,ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व स्टाफ मिळून एकूण २३९ जणांचा सक्रिय सहभाग लाभला.




हा उपक्रम सप्टेंबर महिन्यापासून आठ गावांमध्ये राबविण्यात येत असून,दर शनिवार व रविवार २ तासांच्या सत्रांमध्ये मुलांसाठी विविध कौशल्याधारित खेळ, मनोरंजक उपक्रम आयोजित करण्यात येत होते.प्रत्येक सत्रात ४ कौशल्या धारित खेळ व २ मनोरंजक खेळांचा समावेश करण्यात आला होता.या उपक्रमाच्या माध्यमातून मुलांना खेळाच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण जीवन कौशल्ये विकसित करण्यास मदत झाली.यात स्व-ओळख, समस्या सोडविणे,संवाद कौशल्य,गटकार्याची भावना, तसेच इतरांविषयी काळजी व सहानुभूती यांचा समावेश आहे.

या कौशल्यांचा दैनंदिन जीवनात उपयोग कसा करावा याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. परिणामी,मुलांच्या वागणुकीत व आत्मविश्वासात सकारात्मक व लक्षणीय बदल दिसून आले. कार्यक्रमाचे मार्गदर्शन चाईल्ड फंड इंडिया,मढ येथील सिनियर फील्ड ऑफिसर अभिजित मदने यांनी केले.कार्यक्रमाचे एकूण व्यवस्थापन प्रोजेक्ट को- ऑर्डिनेटर मुक्ता गिरी,तसेच अजित सौर,प्रवीण जगताप व ज्योती शिवमोर यांच्या नेतृत्वा खाली करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन रवी शिंदे यांनी प्रभावीपणे केले.बक्षीस वितरण विश्वास गालफडे,नवले सर व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पार पडले. आभार प्रदर्शन शहाजी कसबे यांनी केले. सहभागी नोंदणीचे काम कविता घोलप, व शेवंता वाघ यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले. मैदान आखणी अनंता बोऱ्हाडे यांनी केली, तर पाणी व्यवस्थापन मंगेश आतकर यांनी पाहिले.

मुलांचे संपूर्ण व्यवस्थापन कृष्णा नवले, रामदास दाभाडे, किशोर शिंदे, कमलेश शिंदे, सुमित जगताप, प्रिया मस्करे, समृद्धी गायकवाड व अपेक्षा यांनी जबाबदारीने पार पाडले. एकूणच, हा कार्यक्रम मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरला असून, खेळाच्या माध्यमातून जीवन कौशल्ये रुजविण्याचा हा एक आदर्श उपक्रम ठरला आहे.

# नाफेडची चना हमीभावाने खरेदी केंद्र सुरू : मानिकराव बारसे

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

नाफेडच्या वतीने चना हमीभावाने पाडव्याच्या पुर्व संध्येला मुहूर्तावर चना खरेदी केंद्राचा शुभारंभ कृऊबाचे सचिव माणिकराव बारसे यांच्या हस्ते दि.१८ बुधवारी रोजी उपबाजार समिती अर्धापूर येथे शुभारंभ करण्यात आला आहे.



नाफेडच्या चना हमीभावाने खरेदी केंद्राचा सभापती संजय देशमुख लहानकर, उपसभापती भुजंग पाटील, संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली शुभारंभ नांदेड कृऊबाचे सचिव माणिकराव बारसे यांच्या हस्ते खरेदी केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी हमाल मापारी संचालक शिवाजी दराडे, सहकार अधिकारी लक्ष्मीकांत देशपांडे, ग्रेडर गणेश डाकुलगे,शेतकरी केशवराव राजेगोरे,जयवंत राजेगोरे,मुस्बीर खान पठाण यांच्या उपस्थितीत करण्यात आला आहे. यावेळी बोलताना सचिव माणिकराव बारसे म्हणाले की शेतकऱ्यांनी नाफेडने चना खरेदी ५८७५ ह.रू क्विंटल हमीभाव दिला आहे. शेतकऱ्यांनी नाफेडला चना देण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. ऑनलाइन नोंदणीसाठी चना या पिकाची नोंदणी २०२६ डिजिटल सातबारा,आधार कार्ड,आधार क्रमांकाशी जोडलेल्या मोबाईल नंबर,नाफेड द्वारा खरेदी करण्यात येणाऱ्या शेतीमालाचे पेमेंट शेतकऱ्याच्या आधार कार्ड लिंक असलेल्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे. पिकाची नोंदणी ऑनलाइन पद्धतीने बायोमेट्रिक फिंगरप्रिंट मशीनद्वारे करण्यात येणार असल्यामुळे शेतकऱ्यांनी चना नाफेडला द्यावा असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव मानिकराव बारसे यांनी केले आहे. यावेळी उपस्थित मान्यवर व शेतकऱ्याचा सत्कार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने करण्यात आला. शुभारंभ यशस्वी करण्यासाठी कर्मचारी पी.एम.कानोडे,ए.एन.खान, उद्धव कदम,कोळशिकवार आदी यांनी चना हमीभावाने खरेदी केंद्राचा शुभारंभ यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

शेतक-यांनी नाफेडच्या चना हमीभावाने खरेदी केंद्राला जास्तीत जास्त चना हरभरा द्यावा असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीच्या करण्यात आले आहे.

# लसीकरण मोहिमेला गती द्या

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य विभागा ची आढावा बैठक घेण्यात आली.गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाचे (Cervical Cancer) समूळ उच्चाटन करण्यासाठी एचपीव्ही (HPV) लसीकरण ही काळाची गरज आहे. ही लस पूर्णपणे सुरक्षित असून पालकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता आपल्या मुलींचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आज आयोजित विशेष आढावा बैठकीत केले. बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आरोग्य विभागाला लसीकरणाबाबत व्यापक जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या. यामध्ये प्रामुख्याने खालील मुद्द्यांवर भर देण्यात आला.

# ऑपरेशन मिलाप' अंतर्गत महाराष्ट्रात संपर्क तुटलेल्या २० मजुरांचा कुटुंबीयांशी सुखद मिलाप

**डांग:गुजरात : (समर्थ गांवकरी)**

डांग जिल्ह्यातील आहवा पोलीस ठाण्याचे पी.आय. आर. एस. पटेल यांच्या पथकाने 'ऑपरेशन मिलाप' अंतर्गत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. महाराष्ट्रात मजुरीसाठी गेलेले आणि गेल्या आठवड्यापासून संपर्कविहीन झालेले कडमाळ गावातील २० मजूर शोधून काढत, आहवा पोलिसांनी त्यांचा सुरक्षितपणे कुटुंबीयांशी मिलाप घडवून आणला.



माहितीनुसार, आहवा पोलीस ठाणे हद्दीतील कडमाळ गावातील सुमारे २० मजूर महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्यातील सटाणा तालुक्यातील बामणगाव येथे मजुरीसाठी गेले होते. मात्र, गेल्या एक आठवड्यापासून त्यांचा कुटुंबीयांशी कोणताही संपर्क होत नव्हता, त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.

या गंभीर प्रकरणी गावातील सामाजिक कार्यकर्ते सुरेशभाई चौधरी यांनी डांग जिल्हा पोलीस अधीक्षक पूजा यादव (IPS) यांच्याशी संपर्क साधला. तक्रार मिळताच पोलीस अधीक्षकांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार, आहवा पोलीस ठाण्याचे पी.आय. आर. एस. पटेल यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथके तयार करण्यात आली. नायब पोलीस अधीक्षक के. आर. डिमरी यांच्या मार्गदर्शनाखाली आहवा पोलिसांनी महाराष्ट्रातील सटाणा पोलिसांच्या मदतीने शोधमोहीम राबवली. अखेर सर्व २० मजुरांना शोधून काढण्यात यश आले. त्यांना सुरक्षितपणे आहवा पोलीस ठाण्यात आणून त्यांच्या कुटुंबीयांशी मिलाप करून देण्यात आला.मजूर सुरक्षित परतल्याने त्यांच्या कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, सर्वांच्या चेहऱ्यावर समाधानाचे स्मित फुलले. या यशस्वी कारवाईबद्दल डांग जिल्हा पोलिसांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

# छावा क्रांतिवीर सेनेची राज्यस्तरीय महत्त्वपूर्ण बैठक

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

छावा क्रांतिवीर सेनेची राज्यस्तरीय अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक शनिवार,दिनांक 21 मार्च रोजी दुपारी 12 वाजता नाशिक येथील ग्रामदैवत कालिका माता मंदिर हॉल येथे आयोजित करण्यात आली असल्याची माहिती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी दिली आहे. या बैठकीमध्ये संघटनेचे आगामी अधिवेशन,पुढील ध्येय-धोरण,संघटनेच्या आंदोलनाची पुढील रणनीती तसेच राज्यभरातील संघटन बांधणी यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल चर्चा करण्यात येणार आहे.विशेष म्हणजे,या बैठकीत संघटनेच्या वतीने काही महत्त्वपूर्ण सामाजिक व राजकीय निर्णय घेण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच या बैठकीदरम्यान अनेक नवीन पदाधिकाऱ्यांचे प्रवेश होणार असून,ज्या समाज बांधवांना छावा क्रांतिवीर सेनेमध्ये काम करण्याची इच्छा आहे,अशा सर्वांनी या बैठकीस उपस्थित राहावे,असे आवाहन संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी केले आहे.

संस्थापक अध्यक्ष करण गायकर यांनी महाराष्ट्रातील सर्व जिल्हाध्यक्ष,शहराध्यक्ष,तालुका अध्यक्ष,विभागीय कार्यकारिणी,प्रदेश कार्यकारिणी तसेच संघटनेचे सर्व सक्रिय पदाधिकारी व सभासद यांनी या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. बैठक ठरलेल्या वेळेतच सुरू होणार असल्याने सर्व पदाधिकाऱ्यांनी वेळेचे काटेकोर पालन करावे तसेच कोणत्याही पदाधिकाऱ्याने गैरहजर राहू नये,असेही त्यांनी आवर्जून नमूद केले आहे.

# ४ हजार एकर जमीन व्यवहारावर प्रश्नचिन्ह

## खासदार नीलेश लंके यांची कारवाईची मागणी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

श्रीरामपूर तालुक्यातील महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व शेती महामंडळाकडे असलेली सुमारे ४ हजार एकर बागायती जमीन झेड आर टू ग्रुप होल्डिंग कंपनी या खाजगी कंपनीस विमान इंधन निर्मिती प्रकल्पासाठी देण्याच्या प्रस्तावावर खासदार नीलेश लंके यांनी गंभीर आक्षेप नोंदविला आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर पत्र देऊन या संपूर्ण व्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. खा. लंके यांनी नमूद केले आहे की, संबंधित कंपनीची आर्थिक, तांत्रिक व व्यावसायिक पात्रता संशयास्पद असून कंपनीची रचना 'शेल' (बोगस) स्वरूपाची असल्याची शक्यता आहे.' झेडआरटू ग्रुप होल्डिंग कंपनी', 'झेडआरटू बायो एनर्जी कंपनी लिमिटेड' तसेच 'प्रवरा बायो एनर्जी कंपनी लिमिटेड' या कंपन्यांमध्ये समान संचालक कार्यरत असल्याने परस्पर संबंधांचे जाळे स्पष्ट होते. या कंपन्यांमध्ये जिमी ओल्सन, नीलेश जैन व सुनील कलापुरे यांचा सहभाग असून जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या कन्या सुप्रिया राधाकृष्ण विखे पाटील तसेच जावई अजित नामदेव ढोकणे हे देखील या कंपन्याचे संचालक असल्याचा दावा खा. नीलेश लंके यांनी नवी दिल्ली येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला. कंपनीच्या आर्थिक व्यवहारांबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. अत्यल्प किंवा शून्य उलाढाल असताना कोट्यवधींचा नफा दर्शविणे, अचानक मोठ्या प्रमाणावर भांडवली वाढ दाखविणे व त्याबाबत स्पष्ट माहिती न देणे या बाबी संशयास्पद असल्याचे खा. लंके यांनी नमूद केले आहे. तसेच,



### खा. लंके यांनी पुढील प्रमुख मागण्या केल्या आहेत :


१) संबंधित कंपन्यांची आर्थिक, तांत्रिक व कायदेशीर पात्रता स्वतंत्र उच्चस्तरीय समितीमार्फत तपासावी.
२) संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी केंद्रीय यंत्रणा (सीबीआय / ईडी) मार्फत करण्यात यावी.
३) शासनाने काढलेला जमीन हस्तांतरणासंदर्भातील निर्णय तात्काळ स्थगित किंवा रद्द करण्यात यावा.

विमान इंधन निर्मितीसारख्या प्रकल्पासाठी आवश्यक असलेली तांत्रिक क्षमता व सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांशी कोणतेही करार नसल्याने प्रकल्पाच्या व्यवहार्यतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संदर्भात शासनाने ४९ वर्षांच्या भाडे कराराने जमीन हस्तांतरणाचा प्रस्ताव पुढे आणला असून त्यासाठी महसूल, उद्योग व पर्यावरण मंत्र्यांची समिती गठीत करण्यात आली आहे. तथापि, सार्वजनिक संपत्तीच्या संरक्षणाच्या दृष्टीने हा निर्णय पारदर्शकतेने व सखोल तपासणी करूनच घ्यावा, अशी भूमिका खा. लंके यांनी मांडली आहे. "सार्वजनिक मालमत्ता ही जनतेची संपत्ती असून तिचे संरक्षण करणे ही शासनाची घटनात्मक जबाबदारी आहे. कोणत्याही परिस्थितीत संशयास्पद कंपन्यांना हजारो कोटींची जमीन देण्यात येऊ नये," असे खा. निलेश लंके यांनी स्पष्ट केले आहे.

# सेन्को गोल्ड अँड डायमंड्स गुढीपाडव्यानिमित्त विशेष ऑफर्स आणि सणासुदीच्या दागिन्यांची घोषणा

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

गुढीपाडवा, जो महाराष्ट्रीयन नवीन वर्ष आणि वसंत ऋतूच्या आगमनाचे प्रतीक आहे, हा सण नवीन सुरुवात, समृद्धी आणि उद्घाटनांशी जोडलेला आहे. पारंपरिकरित्या, सोन्याचे दागिने घरी आणण्यासाठी हा सर्वात शुभ प्रसंगांपैकी एक मानला जातो, जे केवळ संपत्तीच आणत नाहीत, तर सकारात्मक ऊर्जा आणि वर्षाच्या उज्ज्वल सुरुवातीचे प्रतीक देखील आहेत. या नवीन वर्षाच्या निमित्ताने, सेन्को गोल्ड अँड डायमंड्स दागिन्यांचा एक विचारपूर्वक तयार केलेला आणि खास संग्रह सादर करत आहे, जो परंपरा, कारागिरी आणि आधुनिक डिझाइनचा सुंदर मिलाफ साधतो. हे दागिने जीवनातील विशेष




आणि अविस्मरणीय क्षण साजरे करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत, मग ती नवीन वर्षासाठी केलेली नवीन खरेदी असो, कौटुंबिक सोहळे असोत किंवा वैयक्तिक महत्त्वाचे टप्पे असोत.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेवर विशेष लक्ष केंद्रित करून, या संग्रहात पारंपरिक प्रादेशिक डिझाइनपासून प्रेरित दागिन्यांचा समावेश आहे. क्लासिक नथ आणि नाजूक कलाकुसर केलेली तुशी यांसारख्या प्रमुख शैलींना त्यांचा पारंपरिक आत्मा कायम ठेवत, नाजूक आणि आधुनिक तपशिलांसह नव्याने सादर करण्यात आले आहे. समृद्धी, संरक्षण आणि शुभत्वाशी संबंधित असलेले हे दागिने पिढ्यानपिढ्या भावनिक महत्त्व टिकवून आहेत आणि सणासुदीच्या पोशाखाचा अविभाज्य भाग आहेत. या पारंपरिक दागिन्यांव्यतिरिक्त, या संग्रहात सोन्याचे हार, मंगळसूत्रापासून प्रेरित डिझाइन, अँटिक फिनिशचे दागिने, स्टेटमेंट इअररिंग्स आणि समकालीन डिझाइनचाही समावेश आहे, जे सणासुदीच्या प्रसंगांसाठी तसेच दैनंदिन शालीनतेसाठी एक बहुपयोगी पर्याय उपलब्ध करून देतात. या प्रसंगी बोलताना, सेन्को गोल्ड अँड डायमंड्सच्या मार्केटिंग आणि डिझाइन विभागाच्या संचालक आणि प्रमुख, जोयिता सेन म्हणाल्या, "गुढीपाडवा हा आशा, समृद्धी आणि सकारात्मक ऊर्जेने भरलेल्या एका शुभ नवीन सुरुवातीचे प्रतीक आहे. सेन्कोमध्ये, आम्ही परंपरा आणि अर्थ दोन्ही दर्शवणाऱ्या दागिन्यांसह हे विशेष क्षण साजरे करण्यावर विश्वास ठेवतो. आमचे डिझाइन्स जीवनातील महत्त्वाच्या टप्प्यांचा भाग बनण्यासाठी तयार केले आहेत, जे काळाच्या कसोटीवर टिकून राहिलेली उत्कृष्ट कारागिरी दर्शवतात, तसेच आधुनिक विचार आणि बदलत्या फॅशन्स व गरजांनुसार विकसित होत आहेत. यावर्षी, आमच्या विशेष सणासुदीच्या ऑफर्ससह, आम्ही ग्राहकांना खऱ्या अर्थाने शुभ आणि आनंदी सुरुवातीसह नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी आमंत्रित करतो." सणासुदीचा काळ आणखी खास बनवण्यासाठी, सेन्को गोल्ड अँड डायमंड्सने मर्यादित कालावधीसाठी विशेष ऑफर्स सादर केल्या आहेत. ग्राहक सोन्याच्या दरावर प्रति ग्रॅम ₹४०० पर्यंत आणि सोन्याच्या दागिन्यांवरील घडणावळीच्या शुल्कावर २०% पर्यंत सूट मिळवू शकतात. हा ब्रँड हिऱ्यांच्या दागिन्यांवरील घडणावळीच्या शुल्कावर ५०% पर्यंत आणि हिऱ्यांच्या मूल्यावर १२% पर्यंत सूट देत आहे.

## टीच फॉर इंडियाची फेलोशिप अर्जासाठी २२ मार्च मुदत; पदव्युत्तर शिक्षणाचीही संधी

**पुणे: (समर्थ गांवकरी)**

TEACHFORINDIA

शिक्षणातील समानतेसाठी कार्य करणाऱ्या टीच फॉर इंडिया संस्थेने २०२६ सालच्या फेलोशिपसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत २२ मार्च २०२६ असल्याची घोषणा केली आहे. या फेलोशिपमुळे तरुणांना शिक्षण क्षेत्रात कार्य करत विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्याची संधी मिळणार आहे. या फेलोशिपअंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना दोन वर्षे पूर्णवेळ शिक्षक म्हणून काम करताना पदव्युत्तर शिक्षण घेण्याची संधी मिळेल. या कालावधीत फेलोजना 'ट्रान्सफॉर्मेशनल लर्निंग' या विषयातील पदवीही मिळणार आहे. फेलोजना परवडणाऱ्या खासगी शाळा किंवा इंग्रजी माध्यमाच्या सरकारी शाळांमध्ये अध्यापन करावे लागेल. या माध्यमातून ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिक्षणातील असमानता कमी करण्यासाठी प्रयत्न करतील. या अभ्यासक्रमात वर्गातील संस्कृती, डेटा-आधारित अध्यापन, शैक्षणिक नेतृत्व, समुदाय सहभाग, कला व क्रीडा शिक्षण, शैक्षणिक तंत्रज्ञान अशा विविध विषयांचा समावेश आहे. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना नेतृत्व कौशल्य विकसित करण्यास मदत करतो. टीच फॉर इंडियाचे वरिष्ठ अधिकारी अश्वथ भरत यांनी सांगितले की, या फेलोशिपमुळे तरुणांना नेतृत्व विकसित करण्याची संधी मिळते. पदवी पूर्ण केल्यानंतर संशोधन, धोरणात्मक भूमिका किंवा विविध सामाजिक क्षेत्रात काम करण्याचे मार्ग खुले होतात.

सध्या टीच फॉर इंडियाच्या समुदायात १००० हून अधिक फेलोज कार्यरत आहेत. हा उपक्रम शिक्षणाच्या माध्यमातून अधिक समतोल आणि सक्षम समाज निर्माण करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहे. ही पदवी मुंबईतील सेंट झेवियर्स महाविद्यालयामार्फत दिली जाणार असून ती मुंबई विद्यापीठाशी संलग्न आणि मान्यताप्राप्त आहे. या अभ्यासक्रमाची वार्षिक फी सुमारे १५,००० रुपये असून गरजू उमेदवारांसाठी शिष्यवृत्तीचीही सुविधा उपलब्ध आहे.

## इसुझू मोटर्सकडून देशभर 'प्री-समर कॅम्प'; २३ ते २८ मार्चदरम्यान सेवा लाभ

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

इसुझू मोटर्स इंडियाने आपल्या ग्राहकांसाठी देशव्यापी 'इसुझू आय-केअर प्री-समर कॅम्प' आयोजित करण्याची घोषणा केली आहे. हा विशेष सेवा उपक्रम 23 ते 28 मार्च 2026 दरम्यान देशभरातील सर्व अधिकृत सेवा केंद्रांवर राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाचा उद्देश ग्राहकांना उन्हाळ्यापूर्वी वाहनांची योग्य तपासणी करून त्रासमुक्त ड्रायव्हिंग अनुभव देणे हा आहे. इसुझू डी-मॅक्स पिक-अप आणि एसयूव्ही वाहनांसाठी हा कॅम्प उपयुक्त ठरणार आहे. शिबिरादरम्यान ग्राहकांना अनेक आकर्षक सुविधा दिल्या जाणार आहेत. यामध्ये मोफत 37-बिंदू तपासणी, मजुरीवर 10 टक्के सवलत, सुट्ट्या भागांवर व वंगणावर 5 टक्के




सवलत, तसेच विस्तारित वॉरंटीवर 20 टक्क्यांपर्यंत सवलतींचा समावेश आहे.

याशिवाय रोडसाइड असिस्टन्स आणि इतर सेवांवरही विशेष ऑफर उपलब्ध असतील.

हा प्री-समर कॅम्प पुणे, मुंबई, नागपूर, नाशिकसह देशातील अनेक शहरांमध्ये आयोजित करण्यात येणार असून ग्राहकांना आपल्या जवळच्या अधिकृत सेवा केंद्रात जाऊन या सुविधांचा लाभ घेता येणार आहे.

ग्राहकांनी सेवा बुकिंगसाठी इसुझूच्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा जवळच्या डीलरशिपशी संपर्क साधण्याचे आवाहन कंपनीकडून करण्यात आले आहे.

## एथर एनर्जीचा देशभरात ५०० केंद्रांपर्यंत विस्तार

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

भारतातील अग्रगण्य इलेक्ट्रिक दोन-चाकी वाहन निर्माता एथर एनर्जी लिमिटेड यांनी आज जाहीर केले की कंपनीने आपले सर्व्हिस नेटवर्क वाढवून देशभरात 500 अधिकृत सर्व्हिस सेंटरपर्यंत विस्तार केला आहे. वाढत्या रिटेल नेटवर्कसोबतच हा विस्तार करण्यात आला आहे. सुरुवातीपासूनच एथरने ज्या शहरांमध्ये स्कूटर्स विक्रीसाठी उपलब्ध आहेत, त्या प्रत्येक ठिकाणी सर्व्हिस सपोर्ट देण्यावर भर दिला आहे. यामुळे ईव्ही मालकीचा अनुभव ग्राहकांसाठी अखंड, सोपा आणि सोयीस्कर बनवण्यावर कंपनीने आपला भर कायम ठेवला आहे.

## वेळेवर उपचाराने जैन श्रावकाचे जीवघेण्या जखमेतून प्राण वाचले

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

आध्यात्मिक भक्तीने सुरू झालेली जैन विहार समूहाची शांत सकाळ काही क्षणांतच गंभीर अपघातात बदलली. पायी प्रवास करणाऱ्या जैन विहार समूहाचा पुणे जिल्ह्यातील साते गावाजवळ गंभीर रस्ता अपघात झाला. जैन समाजातील पवित्र धार्मिक परंपरा असलेल्या 'विहार'साठी हा समूह कामशेत ते वडगाव असा प्रवास करत होता. त्यावेळी भरधाव ट्रकने धडक दिल्याने २९ वर्षीय जैन श्रावक सहज बाफना हे गंभीर जखमी झाले.


तेथे वडगाव येथील जैन विहार समूहातील सदस्य तसेच मावळ तालुका टीमने तातडीने मदतीसाठी धाव घेतली. त्यानंतर बाफना यांना विलंब न करता पुण्यातील आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. रुग्णालयातील आपत्कालीन ट्रॉमा



टीमने त्यांना दाखल झाल्यानंतर त्यांच्यावर तातडीने दोन तासांच्या आत शस्त्रक्रिया सुरू केली.

रुग्णाच्या मेंदूमध्ये अनेक ठिकाणी रक्तस्राव झाला होता, तसेच डाव्या पायाला आणि याच पायाच्या पंज्याला अत्यंत गंभीर जखम झाली होती. त्यामुळे कायमस्वरूपी अपंगत्व येण्याचा आणि पाय कापण्याची वेळ येण्याचा मोठा धोका निर्माण झाला होता. आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलमधील बहुविद्याशाखीय वैद्यकीय पथकाच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार करण्यात आले. या पथकामध्ये प्लास्टिक आणि पुनर्रचना शल्यचिकित्सक डॉ. सोमनाथ कराड, न्यूरोसायन्सेस वरिष्ठ संचालक व स्कल बेस सर्जन डॉ. राकेश रंजन, ऑर्थोपेडिक सर्जन सल्लागार डॉ. आकाश टाटीया आणि प्लास्टिक सर्जरी सल्लागार डॉ. विक्रम वाघ यांचा समावेश होता. त्यांना अतिदक्षता तज्ज्ञ, भूलतज्ज्ञ, फिजिशियन आणि पुनर्वसन तज्ज्ञ यांचेही सहकार्य मिळाले आणि समन्वयाने उपचार सुरू करण्यात आले. वेळेवर उपचार मिळाल्याने आणि सातत्याने निरीक्षणामुळे दोन दिवसांत रुग्णाच्या डोक्याची जखम लक्षणीयरीत्या सुधारली आणि मेंदूची शस्त्रक्रिया करण्याची गरज पडली नाही. त्यानंतर पुढील काही दिवसांत जखमी पायाची पुनर्रचना व स्थिर करण्यासाठी अनेक गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. अखेरीस डॉक्टरांना त्यांचा डावा पाय आणि पायाचा पंजा वाचवण्यात यश आले. आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल, पुणे येथील ऑर्थोपेडिक सर्जन सल्लागार डॉ. आकाश टाटीया म्हणाले, "रुग्णाला डोक्याची गंभीर दुखापत आणि पायाला गंभीर जखम झाली होती.

## 'L40 अल्ट्रा AE' आणि 'D20 अल्ट्रा' रोबोटिक व्हॅक्यूम लॉंच




**पुणे : (समर्थ गांवकरी)**

स्मार्ट होम इनोव्हेशनमधील जागतिक आघाडीची कंपनी 'ड्रीमी टेक्नॉलॉजी'ने आज भारतात आपल्या रोबोटिक व्हॅक्यूम पोर्टफोलिओमध्ये 'ड्रीमी L40 अल्ट्रा AE' आणि 'ड्रीमी D20 अल्ट्रा' या दोन नवीन उत्पादनांची भर टाकली आहे. आधुनिक घरांसाठी खास तयार केलेली ही उत्पादने हाय-पॉवर्ड सक्शन क्षमता, इंटेलिजेंट नेव्हिगेशन सिस्टम आणि प्रगत अडथळा टाळण्याच्या तंत्रज्ञानाचा एक उत्कृष्ट मिलाफ आहेत. याचा परिणाम म्हणजे एक अचूक आणि अत्यंत कार्यक्षम साफसफाईचा अनुभव मिळतो, ज्यामुळे तुमच्या घराचा कोपरा न कोपरा पूर्णपणे स्वच्छ होतो.

भारतीय ग्राहक ज्याप्रमाणे स्मार्ट होम सोल्यूशन्सचा अवलंब करत आहेत, ते लक्षात घेऊन ड्रीमीने अधिक सोय, कार्यक्षमता आणि वैयक्तिक साफसफाईचा अनुभव देणारी नाविन्यपूर्ण उत्पादने आणली आहेत. ऑटोमेटेड मॉपिंग सिस्टम, स्मार्ट कार्पेट डिटेक्शन आणि स्वयंचलित साफसफाई व देखभालीची क्षमता असलेल्या 'मल्टीफंक्शनल डॉक्स'सह, ही नवीन उत्पादने कोणत्याही त्रासाशिवाय साफसफाईचा अनुभव देतात. या उपकरणांमध्ये ड्रीमीची वॉर्मेक्स™ सक्शन सिस्टम आणि इंटेलिजेंट मॅपिंग यांसारखी प्रगत तंत्रज्ञाने समाकलित केलेली आहेत, जी दैनंदिन साफसफाई सुलभ करतानाच वेगवेगळ्या पृष्ठभागांवर उत्कृष्ट कामगिरी सुनिश्चित करतात. १८ मार्चपासून, L40 अल्ट्रा AE आणि D20 अल्ट्रा अनुक्रमे ५९,९९९ आणि ३९,९९९ रुपयांच्या किमतीत ॲमेझॉन इंडिया आणि निवडक क्रोमा स्टोअर्सवर उपलब्ध होतील. ड्रीमी टेक्नॉलॉजी इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक मनू शर्मा म्हणाले की, "भारतीय ग्राहक दैनंदिन जीवन सोपे करणाऱ्या स्मार्ट आणि उच्च-कार्यक्षमता असलेल्या सोल्यूशन्सचा वाढत्या प्रमाणात स्वीकार करत आहेत. आम्ही पाहत असलेला सर्वात मोठा बदल म्हणजे ऑल-इन-वन आणि उच्च स्वयंचलित साफसफाईच्या उपायांना मिळणारी पसंती, जे मानवी प्रयत्न कमी करून उत्कृष्ट कामगिरी देतात. L40 अल्ट्रा AE आणि D20 अल्ट्रा च्या लॉंचसह, आम्ही आमचा पोर्टफोलिओ इंटेलिजेंट आणि पूर्णपणे एकात्मिक प्रणालींसह विस्तारत आहोत जे प्रगत ऑटोमेशनसह शक्तिशाली साफसफाईचा मेळ साधतात.

ही सोल्यूशन्स ग्राहकांना त्यांच्या घराचे व्यवस्थापन करण्यासाठी अधिक नियंत्रण आणि लवचिकता देतात, तसेच नाविन्यपूर्णतेद्वारे दैनंदिन जीवन अधिक सुसह्य करण्याचे आमचे ध्येय अधिक दृढ करतात."

१९,000Pa वॉर्मेक्स™ सक्शन आणि प्रगत ब्रश सिस्टम: ड्रीमीचे पेटंट असलेले 'TurboForce' मोटर उद्योगातील मानकांपेक्षा कितीतरी पटीने अधिक सक्शन पॉवर (ओढण्याची शक्ती) प्रदान करते.

## चाकणला कचऱ्याच्या दुर्गंधीने प्रवाशांचा कोंडतोय श्वास

**चाकण : (समर्थ गांवकरी)**

बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर गेल्या दहा वर्षांपूर्वी नव्याने बांधण्यात आलेले चाकण एसटी बस स्थानक समस्यांच्या विळख्यात अडकले आहे. बस स्थानक परिसरात कचऱ्यामुळे बकालपणा वाढत चालला असून, वाढत्या दुर्गंधीने प्रवाशांचा श्वास कोंडू लागला आहे. असुविधांचे आगर म्हणून प्रख्यात असलेले चाकण एसटी बस स्थानक हे असून अडचण नसून खोळंबा, अशी स्थिती निर्माण झाली आहे. उन्हाळ्याचे दिवस सुरू झाले असून चाकण एसटी बस स्थानकात पिण्यासाठी स्वच्छ पाणी नाही. स्वच्छता गृह बंद असते. बस स्थानकालगत कचऱ्याचे मोठमोठे ढिग साचलेले दिसत आहेत.

## कॅसाग्रँडची नो प्री-ईएमआय योजना सुरू

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील आघाडीच्या रिअल इस्टेट डेव्हलपर्सपैकी एक असलेल्या कॅसाग्रँडने पुण्यातील अप्पर खराडी जवळ असलेल्या आपल्या कॅसाग्रँड कॅलॅडियम या प्रीमियम रेसिडेन्शियल प्रोजेक्टमध्ये 'नो प्री-ईएमआय' योजना सुरू केली आहे. ही योजना मर्यादित कालावधीसाठी असून फक्त नवीन बुकिंगसाठी लागू आहे. ग्राहकांसाठी ही ऑफर 31 मार्च 2026 पर्यंत उपलब्ध राहणार आहे. या योजनेचा उद्देश घर खरेदी प्रक्रिया अधिक सोपी आणि परवडणारी बनवणे हा आहे, ज्यामुळे इच्छुकांना सहजपणे स्वतःचे घर घेता येईल. आजच्या काळात अनेक लोकांना घरभाडे, ईएमआय आणि इतर खर्च एकाच वेळी सांभाळावे लागतात. अशा परिस्थितीत ही योजना घर खरेदी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी कॅसाग्रँडचा एक प्रयत्न आहे. या योजनेअंतर्गत,



ठराविक कालावधीपर्यंत कॅसाग्रँड खरेदीदाराच्या वतीने प्री-ईएमआय स्वतः भरते. त्यामुळे घर बांधकाम सुरू असताना ग्राहकांना लगेच मासिक हप्त्यांचा ताण येत नाही आणि ते सहजपणे आपले घर खरेदी करू शकतात. मर्यादित कालावधीसाठी असलेली ही ऑफर घर खरेदी प्रक्रिया सोपी, स्पष्ट आणि सोयीची व्हावी यासाठी तयार करण्यात आली आहे. ग्राहकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी फक्त प्रॉपर्टी बुक करावी लागेल आणि ठरलेल्या वेळेत होम लोनची प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. कॅसाग्रँड कॅलॅडियममध्ये आकर्षक डिझाइन असलेली प्रशस्त 2 आणि 3 बीएचके घरे उपलब्ध आहेत. येथे 110 पेक्षा जास्त आधुनिक सुविधा आहेत, जसे की 1800 चौ.फुट इन्फिनिटी पूल, अँफीथिएटर, योगा कोर्ट आणि मल्टी-पर्पज कोर्ट आणि इतर अनेक सुविधांचा समावेश आहे. या प्रोजेक्टमध्ये सुमारे 70% मोकळी जागा असून त्याची रचना सिंगापूर स्टाइलमध्ये करण्यात आली आहे.

## नाराजीबद्दलचे वृत्त गैरसमजातून आल्याचा वाडेकर यांचा खुलासा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

रिपब्लिकन पक्ष (आठवले गट) भारतीय जनता पक्षाचा मित्रपक्ष असल्याने महापालिकेत आपल्याला उपमहापौर पद मिळाले असले तरी योग्य तो मानसन्मान मिळत नसल्याने आपण नाराज असल्याचे वृत्त काही प्रसारमाध्यमात प्रसिद्ध झाले आहे. हे वृत्त गैरसमजातून आले असून आपली कशाबद्दलही नाराजी नाही, असा सुस्पष्ट खुलासा उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी केला आहे. महापालिकेच्या अनेक कार्यक्रमांना आणि बैठकांना उपमहापौरांना निमंत्रण दिले जात नाही. विशेषतः खुद्द वाडेकर यांच्या प्रभागात झालेल्या महापौर चषक स्पर्धेला त्यांना निमंत्रण नव्हते, असे या वृत्तामध्ये नमूद करण्यात आले आहे. मात्र, हा प्रकार तांत्रिक त्रुटीमुळे झाल्याचे स्पष्टीकरण वाडेकर यांनी दिले. रिपब्लिकन पक्ष महापालिका निवडणूक भाजपच्या सोबत राहून लढला. महापालिका विषयातील आपल्या पक्षाचे योगदान लक्षात घेऊन भाजपने आपल्याला उपमहापौर पद दिले. पदाबरोबरच योग्य प्रकारे मानसन्मान देखील भाजपकडून मिळत आहे. त्यामुळे नाराजीचे कोणते कारणच नाही, असे वाडेकर यांनी स्पष्ट केले. भाजप आणि रिपब्लिकन पक्ष हे दीर्घकालीन मित्र पक्ष असून ते सत्ता आणि पदासाठी एकत्र आलेले नाहीत. व्यक्तिगत मानसन्मानावरून या मित्र पक्षांमध्ये धुसफूस होणे केवळ अशक्य आहे. भाजप आणि रिपब्लिकन पक्ष हे आजही मित्रपक्ष आहेत आणि यापुढेही मित्रपक्ष राहतील. एकोप्याने आणि कार्यक्षमतेने महापालिकेच्या कारभाराचा गाडा सुरळीत चालवून पुणेकरांचे जीवन सुलभ, समृद्ध आणि समाधानी करणे हेच आमचे समान उद्दिष्ट आहे, असेही वाडेकर यांनी सांगितले.

## युद्धकाळ : गुंतवणुकची गुरुकिल्ली 'तिच्या' हाती



**डॉ. पूनम टंडन, मुख्य गुंतवणूक अधिकारी, इंडिया फर्स्ट लाईफ इन्शुरन्स कंपनी लि.**

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

फेब्रुवारी २०२५ मध्ये वेल्स फार्गो इन्व्हेस्टमेंट इन्स्टिट्यूटने केलेल्या अभ्यासात असे दिसून आले की महिलांना गुंतवणुकीत पुरुषांपेक्षा चांगला परतावा मिळू शकतो. कारण महिला गुंतवणूक करताना अधिक शिस्तबद्ध आणि विचारपूर्वक निर्णय घेतात. वॉरिक बिझनेस स्कूलच्या संशोधनानुसार महिला जोखमीच्या आणि अंदाजावर आधारित शेअर्समध्ये गुंतवणूक करण्याची शक्यता कमी असते. तोटा होत असल्यास त्या अशा गुंतवणुकीतून लवकर बाहेर पडतात. महिलांना जोखीम ओळखण्याची क्षमता चांगली असते, त्यामुळे त्या आपली गुंतवणूक वेगवेगळ्या पर्यायांमध्ये विभागतात. त्या आर्थिक शिक्षण घेण्यास आणि तज्ज्ञांचा सल्ला घेण्यासही तयार असतात. त्यामुळे त्या अचानक निर्णय घेण्याऐवजी नियोजन करून गुंतवणूक करतात.

आता गेल्या दहा दिवसांपासून सुरु असलेल्या इराण विरुद्ध इस्रायल आणि अमेरिका या युद्धामुळे जागतिक आर्थिक घडी विस्कटलीय. त्यामुळे भारतीय बाजारात देखील चढ-उतार होत आहेत. दररोजच्या जगण्यात संकटांच्या मालिकांशी सतत सामना करणाऱ्या आजच्या स्त्री, अशा संधींचे सोने करण्याची क्षमता महिलांच्या अंगी आपसूकच वाढलेली असते. या सर्व गुणांमुळे दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्यासाठी लागणारे महत्त्वाचे गुण—संयम, शिस्त, सातत्य आणि योग्य जोखीम घेण्याची तयारी—महिलांमध्ये दिसून येतात. घरगुती बजेट हाताळण्याचा अनुभव असल्यामुळेही त्या आर्थिक बाबतीत अधिक सावध असतात. पण तरीही महिला आर्थिक बाबतीत सक्षम असूनही गुंतवणुकीचे निर्णय घेण्यात पुरुषांच्या तुलनेत मागे का आहेत असा प्रश्न उरतोच.

इंटरनॅशनल सेंटर फॉर रिसर्च ऑन विमेनच्या मते, एखादी महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम तेव्हाच मानली जाते जेव्हा तिला आर्थिक प्रगती करण्याची संधी आणि आर्थिक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दोन्ही असते. महिलांकडे अनेकदा आर्थिक निर्णय घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य नसते. त्यामुळे त्या गुंतवणुकीत समान प्रमाणात सहभागी होत नाहीत.

क्रिसिल आणि एम्फीच्या अभ्यासानुसार, स्वतःचा व्यवसाय करणाऱ्या ५५ टक्के महिला स्वतः आर्थिक निर्णय घेतात, तर नोकरी करणाऱ्या महिलांमध्ये हा आकडा ३९ टक्के आहे. ज्या महिला नियमितपणे आर्थिक निर्णय घेतात त्यांना बचतीची गुंतवणूक करणे अधिक सोपे वाटते.

वयानुसार महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य वाढते. ४५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या ६५ टक्के महिला स्वतः आर्थिक व्यवहार सांभाळतात. तसेच आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबातील ५८ टक्के महिलांना आर्थिक निर्णय घेण्याचे अधिक स्वातंत्र्य असते.

अलीकडच्या काळात भारतातील महिलांमध्ये आर्थिक जागरूकता वाढत आहे. त्यामुळे महिलांची गुंतवणूकही वाढत आहे. मार्च २०१७ मध्ये गुंतवणूक क्षेत्रातील महिलांचा हिस्सा १५ टक्के होता, तो डिसेंबर २०२३ मध्ये जवळपास २१ टक्के झाला आहे. बी -३० शहरांमध्ये ही वाढ अधिक दिसून येते. या शहरांमध्ये महिलांचा गुंतवणुकीतील हिस्सा १७ टक्क्यांवरून २८ टक्के झाला आहे. तरीही महिलांची गुंतवणूक प्रामुख्याने सुरक्षित पर्यायांमध्ये असते. क्रिसिल डीबीएसच्या अहवालानुसार भारतातील महिला त्यांच्या पैशांपैकी ५१ टक्के रक्कम फिक्स्ड डिपॉझिट आणि बचत खात्यांमध्ये ठेवतात. भांडवली बाजारात त्यांची गुंतवणूक सुमारे १५ टक्के आहे. जर महिलांना गुंतवणुकीचे पर्याय, जोखीम आणि परतावा यांची चांगली माहिती मिळाली, तर त्या अधिक संतुलित आणि फायदेशीर गुंतवणूक पोर्टफोलिओ तयार करू शकतात.

पुरुष आणि महिलांच्या उत्पन्नात अजूनही फरक आहे. सरासरी महिलांचे उत्पन्न पुरुषांच्या तुलनेत सुमारे १७ टक्के कमी असते. त्यामुळे आर्थिक समानता मिळवण्यासाठी महिलांना अधिक बचत करावी लागते.

जोखीम घेण्याची तयारी व्यक्तीच्या आर्थिक उद्दिष्टांवर, अनुभवांवर आणि जबाबदाऱ्यांवर अवलंबून असते. समाजात महिलांना आर्थिक बाबींचा अनुभव अनेकदा उशिरा मिळतो.